बुधवार, ७ डिसेंबर २०२२
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -११३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 07 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-113 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5



## कर्नाटकी धिंगाणा



कन्नड संघटनांनी मंगळवारी सीमेवर लाल-पिवळे झेंडे फडकून महाराष्ट्र सरकार आणि मराठी भाषिकांविरोधात गरळ ओकत महाराष्ट्राच्या वाहनांची तोडफोड केली.

# त्यांना जशास तसे उत्तर देऊ

## संभाजीराजे छत्रपतींचा कर्नाटक सरकारला इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : बेळगावमधील हिरे बागेवाडी टोल नाक्याजवळ कन्नड संघटनांकडून महाराष्ट्रातील ट्रकवर दगडफेक करण्यात आली असून यावरून आता राज्यातील नेते आक्रमक झाले आहेत. या घटनेनंतर अनेक राजकीय नेते वेगवेगळ्या माध्यमातून आपली प्रतिक्रिया देत आहेत. यातच माजी खासदार संभाजीराजे छत्रपतींनी आपली प्रतिक्रिया देत या घटनेचा निषेध केला आहे.**



संभाजीराजेंनी ट्वीट करत म्हटले आहे की, छत्रपती शिवरायांचे चित्र असलेल्या वाहनांची कन्नडीगांनी केलेली तोडफोड निषेधार्ह असून महाराष्ट्रात त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल. त्यांनी कर्नाटक सरकारला इशारा देत म्हटले आहे की, रेणुकादेवी यात्रेनिमित्त कोल्हापूरातील लाखो भाविक सौंदत्ती येथे आहेत. त्यांची सुरक्षा कर्नाटक सरकारने करावी अन्यथा वेळप्रसंगी मला कर्नाटकात यावे लागेल. यावरच शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनीही आपली प्रतिक्रिया देत शिंदे-फडणवीस सरकारवर हल्लाबोल केला आहे. महाराष्ट्र पेटला तर सरकारला भारी पडेल, असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. ते म्हणाले आहेत की, राज्य सरकार डोळे मिटून बसले आहे. राऊत म्हणाले की, स्वाभिमान, अस्मिता, महाराष्ट्राचा अभिमान, आपल्या लोकांविषयी प्रेम आहे की नाही. पुण्यात शिवसैनिकांनी आंदोलन केले आहे. महाराष्ट्रासाठी लढणाऱ्या शिवसैनिकांना शिंदे-फडणवीस सरकारचे पोलीस लाठ्या काठ्यांनी मारहाण करत आहेत. कोल्हापुरातही तेच सुरु आहे. तुम्ही कोणाचे काम करत आहात, असा प्रश्न राऊत यांनी राज्य सरकारला केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत राऊत म्हणाले आहेत की, या घटनेनंतर सरकार काय करत आहे. मुख्यमंत्री कुठे आहेत? जे सांगतात आम्ही त्या काळात बेळगावात जाऊन लाठ्या-काठ्या खाल्या. जर तुम्ही सीमाप्रश्नासाठी लाठ्या खाल्या आहेत, तर आज तुम्ही ज्या खुर्चीवर बसलेला आहेत, त्या खुर्चीवरून महाराष्ट्राचा कर्नाटकने केलेला अपमान तुम्ही पाहिला नसता.



## अभिवादन

*महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुंबईमधील दादर येथील चैत्यभूमीवर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, ॲड. प्रकाश आंबेडकर, दीपक केसरकर, प्रवीण दरेकर आदींसह मान्यवर.*

# तर गर्भपाताचा अंतिम निर्णय मातेचाच

## दिल्ली उच्च न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांमध्ये देशात गर्भपाताच्या घटनांमध्ये




मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. अवैधपणे गर्भपात करणाऱ्या काही डॉक्टरांचाही मध्यंतरी पर्दाफाश झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ठराविक महिन्यांनंतर गर्भपात करणे कायद्याने गुन्हा ठरवण्यात आलेला असताना यासंदर्भात एका प्रकारच्या सुनावणीदरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. गर्भाच्या प्रकृतीसंदर्भात वैद्यकीय गटाने सविस्तर अहवाल दिल्यानंतर गर्भधारणा किंवा गर्भपाताचा अंतिम निर्णय हा मातेचाच असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती प्रतिभा सिंह यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. एका २६ वर्षीय महिलेने गर्भाच्या शारिरीक व्यंगाचे कारण याचिकेत नमूद करत ३३ आठवड्यांनंतर गर्भपात करण्याची परवानगी न्यायालयाकडे मागितली होती. यासंदर्भात न्यायालयाने दिल्लीतील एलएनजेपी रुग्णालयाला गर्भाची सविस्तर तपासणी करून त्याच्या प्रकृतीविषयी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात न्यायमूर्ती प्रतिभा सिंह म्हणाल्या, अशा प्रकरणांमध्ये बाळाला जन्म द्यायचा की गर्भपात करायचा, यासंदर्भात मातेचा निर्णय महत्त्वाचा आहे. बाळासाठी सन्मानजनक आयुष्य निश्चित करण्यासाठी हे आवश्यक आहे. न्यायालयाने यासंदर्भात आदेश देताना संबंधित महिलेला गर्भपाताची परवानगी दिली. तसेच, अशा प्रकरणांमध्ये रुग्णालयांनीही सविस्तर आणि स्पष्ट अहवाल देणे आवश्यक असल्याची गरज न्यायालयाने यावेळी व्यक्त केली. या प्रकरणात फक्त एकच काळजीची बाब आहे, ती म्हणजे तंत्रज्ञान. अनेक प्रकारच्या शारिरीक व्यंगाविषयी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माहिती मिळवली जाऊ शकते. मात्र, या प्रकरणात संबंधित रुग्णालयाने योग्य त्या पद्धतीने अहवाल सादर केला नाही, असेही न्यायालयाने यावेळी नमूद केले. मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी अर्थात एमटीपी कायद्यानुसार भारतात गर्भवती महिलेला २४ आठवड्यांनंतर गर्भपात करण्यासाठी न्यायालयाच्या परवनगीची आवश्यकता असते.



# उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## तुमची देहबोली सांगते तुमच्याबद्दल...



जशी आपली मायबोली तशीच देहबोली. मायबोलीत आपण भाषेचा म्हणजे शब्दांचा वापर करतो. तर देहबोली म्हणजे ' शब्दावाचून भाषा.' ज्ञानेश्वर माउलींच्या शब्दात सांगायचे तर देहबोली म्हणजे ' शब्देविण संवादू .' जशी आपली सावली सदैव आपली सोबत करते तशीच आपली देहबोली सदैव सावलीसारखी आपल्यासोबत असते. अगदी जन्मापासून. थोडक्यात म्हणजे ती आपल्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग असते.

तुमची देहबोली तुम्ही काही न बोलता तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल सांगत असते. म्हणून आपल्या देह्बोलीबद्दल आपण जागरूक असले पाहिजे. हाच या लेखाचा उद्देशही आहे. आधी आपण काही उदाहरणे पाहू. खाली काही घटना दिल्या आहेत. त्या काय सांगतात बघा.

१. शंतनुच्या शाळेत आज त्याचा निकाल होता. तो घरी आला तोच गाणे गुणगुणत. आणि घरी आल्यावर तर त्याने उंच उडीच मारली.

२. राहुल मंद पावलांनी चालत आला. त्याचे खांदे खाली झुकलेले होते. मान सुद्धा किंचित खाली झुकली होती.

३. ग्यानबा आपल्या शेताच्या बांधावर बसला होता. गुडघ्यात डोके खुपसून शांत बसून होता.

४. अन्विता वर्गात बसल्या बसल्या जांभया देत होती. सारखे घड्याळाकडे पाहत होती.

यावर दिलेल्या घटना किंवा प्रसंग आपल्याला फक्त त्या व्यक्तीच्या देहबोलीतून बरेच काही सांगून जातात. शंतनू कसा चालत आला, त्याने उडी मारली ही त्याची देहबोली आपल्याला त्याने काही न सांगता सुद्धा आपल्याला सांगून जाते की त्याने परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. राहुलची चाल आपल्याला तो निराश किंवा नाराज झाला आहे हे सांगते. ग्यानबाचे त्या अवस्थेतील बसणे आपल्याला सांगते की तो दु:खी झालेला आहे. तर अन्विताची देहबोली आपल्याला सांगते की तिला कंटाळा आला आहे. आपण केव्हा एकदा बाहेर जाऊ असे तिला झाले आहे. **क्रमशः**



# आनंदी पहाट

## विचारांचे थैमान होणे थांबवावे

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते. कारण ह्या सर्वच बाबींचा संबंध आपल्या व्यक्त होण्यासठी असतो. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळे आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं; पण वळत नसतं, हीच तर उणिव असते. मनांत येणारी प्रत्येक बाब नवीन एक प्रश्न घेऊन येत असते. त्या प्रश्नामुळे आपलं मस्तक गरम होत असतं; पण काहीवेळा शोधूनही उत्तर सापडत नाही. कधी कधी उत्तर सोप्प असूनही, माहिती असूनही वेळेला सुचत नाही, कारण ते आठवत नाही. काहीअंशी निर्माण झालेल्या संभ्रमामुळे थोडं जे काही मिळालंय ते सगळ्यांना दिसत असतं, त्यामुळे हरलोय हे मान्य करायला जग तयार नसतं आणि जे मिळालंय ते असं काही मिळालेलं असतं कि, आपण जिंकलोय हे मान्य करायला आपलं मन तयार नसतं.



आधुनिक केसरी

## पावलो विसावा | तुझ्या कृपे ||

जीवाचे ह्या हाल | झाले रात्रंदिन ||
तुझेच चिंतन | मन करी ||१||
संसाराचे सुख | नाथाने दावीले ||
जगणेच झाले | दिव्य लेणे ||२||
व्यसनाचा संग | कधी न जडला ||
म्हणूनी भेटला | ज्ञानदेव ||३|
तृप्त झालो आज | भजनात तुझ्या ||
अंतरात माझ्या | तुकाराम ||४||
मागणे न आता | नाही तुज देवा ||
पावलो विसावा | तुझ्या कृपे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


## भक्ती

भ्रमे विभ्रमे चित्त माझे तरीही
क्षमा तू करीशी समीपे बसोनी।
मला सांगते तू हिताच्या प्रयुक्ती
कधी दिव्य गोष्टी शिवे तू हसोनी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# अखंड नामस्मरणात राहणे म्हणजेच उपासना




आधुनिक केसरी

देवाच्या आड काय येत असते ? आपल्याला देवाची प्राप्ति होत नाही याला वास्तविक आपणच कारण असतो. आपण लोकांना त्याबद्दल दोष देत असतो, पण इतर लोक त्याच्या आड येत नसून आपण स्वतःच आड येत असतो, हे थोडा विचार केला असता समजुन येईल. ज्याला आपले म्हणायला पाहिजे होते त्याला आपले न म्हणता, आपण दुसऱ्या कोणाला तरी आपले म्हणत असतो. आपला मुलगा, बायको, भाऊ, या सर्वांना आपले म्हणत असतो. हे सर्वजण काही मर्यादेपर्यंत आपले असतात. परंतु देवाला जर आपले म्हटले, तर तो सदासर्वकाळ आपलाच असतो, आणि आपल्याला तो मदत करायला तयार असतो. तुम्हा सर्वांना द्रौपदीची गोष्ट माहीत आहे ना ? आपले भ्रतार आपले रक्षण करतील असे तिला वाटत होते. परंतु त्या कोणाकडून काही होणे शक्य नाही असे तिला दिसले, तेव्हा तिने अनन्यतेने श्रीकृष्णाचा धावा केला आणि तेव्हांच कृष्ण तिच्याकरिता धावून आले. म्हणजे काय, की आपण ज्याला आपले म्हणत असतो ते खरे आपले नसतात. आपण परमात्म्याला आपले म्हणावे, 'मी त्याचा आहे' अशी सदासर्वकाळ आठवण ठेवावी, आणि जे जे घडत असते ते ते सर्व त्याच्या इच्छेने होत असते ही भावना ठेवावी. अशी भावना होण्याकरिता आपण त्याची उपासना करायला पाहिजे. उपासना करणे म्हणजे तरी काय ? आपण देवाचे आहोत, आपण नेहमी त्याच्या सान्निध्यात आहोत, असे वाटणे. असे वाटण्याकरिता त्याच्या नामस्मरणात राहणे जरूर आहे. आपण त्याच्या नामस्मरणात राहिलो म्हणजे तो सदासर्वकाळ आपल्या जवळ राहतो. तुम्ही कोणाचे नाव घेतले म्हणजे त्याची मूर्ति जशी तुमच्या ध्यानात येते, त्याप्रमाणे देवाचे नाव घेतले म्हणजे तो तुमच्याजवळ असतो. देव कसा आहे हे विचारले तर कसे सांगता येईल ? तो नामात आहे हे प्रत्यक्ष श्रीकृष्णांनी सांगितले आहे. नाम हे त्याचे रूप, म्हणून नामस्मरण केले म्हणजे देवाला तुमच्याजवळ येणे भागच पडते. हे नामस्मरण कसे करावे ? समर्थांनी सांगितले आहे की, 'काहीच न करूनि प्राणी ॥ रामनाम जपे वाणी । तेणे संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागी सांभाळी ॥' आपण नाम घेताना काहीच करीत नाही का ? आपण त्या वेळी संसाराची काळजी करीत असतोच ना ? म्हणजेच त्या वेळी आपण मीपणा ठेवून नामस्मरण करीत असतो ! मीपणारहित जो नामस्मरण करील त्यालाच देव सांभाळित असतो; आणि जो स्वस्थ राहील त्याचा योगक्षेम चालवीत असतो.

**आजचे बोधवचन आहे - आपण कोणाचे तरी होऊन राहावे.; गुरूचे तरी किंवा देवाचे तरी. श्रीराम समर्थ**

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**जया मानला देव तो पूजिताहे।**
**परी देव शोधूनि कोण्ही न पाहे।**
**जगी पाहता देव कोट्यानकोटी।**
**जया मानली भक्ति जे तेचि मोठी।।१७८।।**

**श्लोकार्थ :** ज्याला जो देव आवडतो तो त्या देवाची पूजा करतो. खरा देव कोणीच शोधून पाहत नाही. ज्याला ज्याची भक्ती आवडते तीच तो श्रेष्ठ मानतो. **विवेचन :** 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या म्हणी प्रमाणे जितके माणसे तितके देव असे म्हणता येईल. मनुष्य आपल्या रुचीप्रमाणे देव निवडतो अथवा देवाला निर्माण करतो.मनुष्य सात्विक असला की त्याचा देव सात्विक असतो, मनुष्य राजस असला की त्याचा देव राजस असतो... कोणी हनुमंताची पूजा करतो, कोणी शंकराची, कोणी मारुतीची... प्रत्येक मनुष्यानुसार त्याचा देव वेगळा, त्याची पूजा वेगळी, देवाचा नैवेद्य वेगळा.... समर्थ म्हणतात,"**उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद । आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ॥**" (दास. १९.०५.०४) अहंकार नेहमी वैयक्तिकच असतो असे नाही कधी तो संस्थागत असतो, कधी तो कुटुंबाचा म्हणून असतो, तर कधी तो उपासनेचा किंवा उपास्य देवतेचा देखील असतो. सर्व संतांनी या अहंकाराला पुरते जाणले आहे आणि म्हणून ते सर्वप्रथम अहंकाराचे विसर्जन करण्यास सांगत असतात. वरील प्रकारचा कोणता ना कोणता अहंकार मनुष्याच्या अंगी असतोच असतो, त्यामुळे तो खरा देव शोधण्याचा प्रयत्न देखील करीत नाही. खरा देव किंवा परमात्मा हा निर्विकार किंवा निर्विकल्प आहे. पण प्रत्येकाला देव आपल्या सोयीसाठी आणि सोयीनुसार हवा असतो म्हणून मग नवसाला पावणारा किंवा संपत्ती, हमखास पुत्रप्राप्ती करून देणारा किंवा तत्सम नामाभिदान असलेले नवीन देव तयार होत असतात. देवांची संख्या वाढली म्हणून हिंदू धर्मात तसा विशेष फरक पडत नाही, पण सध्या मठ मंदिरे, तीर्थक्षेत्रे आणि तेथील गर्दी बघितली की यातले खरे भक्त किती आणि पर्यटक किती असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. आणि विशेष म्हणजे देवांच्या गाभाऱ्यात इतकी गर्दी असूनही समाजमनात त्याचा प्रभाव जाणवत नाही. मनुष्याच्या स्वभावात काहीच चांगला बदल होत आहे कसे म्हणता येत नाही. याला मुख्य कारण असे आहे की आपण फक्त भक्तीची नक्कल ( मराठीत त्याला COPY असे म्हणतात ) करतोय. भक्तीमधील सात्विकता जाऊन त्यात राजस आणि तामसपणा वाढत आहे. हा नियम भक्तांसाठीक नव्हे तर उपासना या सदरात मोडणाऱ्या सर्वच व्यवस्थांना कमी अधिक प्रमाणात लागू झाला आहे. मग ते छोट्या गावातील देऊळ किंवा तथाकथित प्रसिद्ध मंदिर असेल. त्यामुळे सध्या देवाच्या दर्शनासाठी पैसे देऊन रांगा, अतिविशिष्ठ व्यक्तीसाठी वेगळी व्यवस्था, ज्या संतांनी आयुष्यभर भिक्षा मागून जगाला ज्ञान दिले त्यांना सोन्या-चांदीने मढविले जात आहे. अशा सामान्य मनुष्याच्या पचनी न पडणाऱ्या विविध गोष्टी घडत आहेत. याला भक्तीमार्ग म्हणायचा का ? प्रत्येकाने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे, नाही का ? देवासमोर पैसे किंवा काही दान देण्याची पद्धत ही आपली आसक्ती कमी होण्यासाठी आहे, हे आपण विसरून गेलो आहोत. आज देवळात सुद्धा 'देण्या'ची स्पर्धा सुरु झाली आहे. ज्या मंदिराचे उत्पन्न जास्त तो देव श्रेष्ठ मानला जातोय. 'देणारा देव' ही संकल्पना जाऊन 'दुसऱ्याला द्यायला (समाजरुपी ईश्वराला) शिकविणारा' देव ही संकल्पना समाजात रुजायला हवी, आपण सर्वांनी तसा प्रयत्न करू. मंदिरात जाऊन मनुष्याच्या भक्तीची कोटी (पातळी) वाढायला हवी, असे सर्व संत सांगतात. मागील श्लोकात सांगितल्या प्रमाणे चांदोमामा हा आपला मामा नसून तो चंद्र आहे, हे कळाले पाहिजे. समर्थांचे आराध्य दैवत प्रभू श्रीराम होते. साधना करता करता त्यांनी शेवटी आत्मारामाला जाणून घेतले. तसे साधकाने करावे असे समर्थ आपल्याला सांगतात. **उपासनेचे सेवटीं । देवां भक्तां अखंड भेटी । अवुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥**"

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# सत्तेत असताना शांत बसणाऱ्यांना कंठ कसा फुटला?

## सीमाप्रश्नावरून भाजपाचा ठाकरेंना सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जनादेश खुंटीवर टांगून बळकावलेली सत्ता गेल्यामुळे नैराश्य आलेल्या महाविकास आघाडीला विरोधकाची भूमिकाही जमत नसून त्यातून आलेल्या नैराश्यातून 17 डिसेंबरचा मोर्चा घोषित करण्यात आला अशी टीका प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मंगळवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणून अपयशी ठरल्याने महाराष्ट्राला संकटांच्या खाईत ढकलणाऱ्या ठाकरेंना आता सीमावादावर कंठ फुटला असला तरी सत्तेत असताना याच प्रश्नावर अंग झटकून वादग्रस्त सीमाभाग केंद्रशासित करण्याची मागणी त्यांनी केली तेव्हा हे उसने अवसान कोठे गेले होते, असा सवालही उपाध्ये यांनी केला.

सीमाप्रश्न सोडवण्याची आमची तयारी आहे अशी पोकळ गर्जना उद्धव ठाकरे यांनी केल्याच्या आज प्रसिद्ध झालेल्या काही बातम्या हास्यास्पद असून सत्तेत असताना ज्यांनी हा वाद केंद्रावर ढकलला ते आता फुशारक्यांपलीकडे काय करणार असा टोलाही श्री. उपाध्ये यांनी हाणला. "महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील वादग्रस्त भागाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून त्याचा जो निकाल येईल तो स्वीकारू, पण तोवर हा भाग केंद्रशासित करावा" अशी मागणी ठाकरे यांनी केली होती, या माहितीकडे उपाध्ये यांनी लक्ष वेधले. सत्तेत असताना सतत



केंद्र सरकारकडे हात पसरणारे, प्रत्येक प्रश्न केंद्राकडे ढकलून रडगाणे गाणारे आणि प्रत्येक जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलणारे ठाकरे आता सत्ता गेल्यावर आणि पक्ष संपल्यावर उसने अवसान आणून पोकळ वक्तव्ये करत सुटले आहेत.

महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सोडविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी दर्पोक्ती २०२१ मध्ये करणाऱ्या ठाकरेंचा सूर सत्तेवर येताच बदलला, आणि नाकर्तेपणाची जाणीव झाल्यावर जानेवारी २०२१ मध्ये त्यांनी वादग्रस्त भाग केंद्राकडे ढकलण्याचा प्रयत्न करून पाहिला. मुख्यमंत्री असूनही कोणतीच जबाबदारी न घेता, तुमची जबाबदारी तुम्हीच घ्या असे जनतेला सांगणाऱ्या ठाकरे यांनी सीमावादातून पळ काढला होता, आणि आता सत्ता, पक्ष काहीच हाती नसताना पुन्हा तोंड उघडले आहे. सत्ताभ्रष्ट झाल्यामुळे आलेल्या नैराश्यातूनच असे प्रकार घडतात, असेही श्री. उपाध्ये म्हणाले. येत्या १७ तारखेला मुंबईत मोर्चा काढण्याची तयारी महाविकास आघाडीने सुरू केली आहे. अधिवेशन नागपुरात असताना मोर्चा मुंबईत काढण्याचे आघाडीचे नियोजन पाहता, मोर्चाची जबाबदारी ठाकरेंच्या उरल्यासुरल्या पक्षावर ढकलून बघ्याची भूमिका घेण्याचा काँग्रेस-राष्ट्रवादीचा डाव स्पष्ट दिसतो. आता हाताच्या बोटावर मोजण्याएवढे कार्यकर्ते असलेले ठाकरे महामोर्चा काढायला निघाले हाच मोठा विनोद आहे, असेही ते म्हणाले. सत्तेवर असताना महाराष्ट्राचे हित साधणे जमले नाहीच, आता विरोधात बसून राज्याचे अहित तरी करू नका, असा टोलाही श्री. उपाध्ये यांनी लगावला.

१७ डिसेंबरचा मोर्चा हा वैफल्यग्रस्तांचा असल्याची खोचक टिप्पणी उपाध्ये यांनी केली. मोर्चा काढण्याआधी महाराष्ट्राचा अपमान करणा-या तत्कालिन सरकारमधील घटक पक्षांनी काही गोष्टींचा खुलासा करावा, असे आव्हान श्री. उपाध्ये यांनी दिले. सत्तेत असताना महाराष्ट्रात कोरोनामुळे सर्वाधिक मृत्यू होत असताना, अन्य राज्ये बळीराजाला मदत करीत असताना शेतक-यांना एक पैशाचीही मदत न करताना, धनदांडग्यांना, मद्य विक्रेत्यांना सवलत देताना महाराष्ट्राचा जो अपमान झाला त्याचा खुलासा करा असे उपाध्ये यांनी ठणकावून सांगितले.

सीमा प्रश्नाच्या मुद्द्यावरून कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी कर्नाटकमध्ये महाराष्ट्रातील काही वाहनांवर जे हल्ले केले, या हल्ल्यांमागे पाठीमागून फूस लावण्याचे काम काँग्रेस व जेडीएस करत असल्याचा घणाघात उपाध्ये यांनी केला.

# आवाहन महाराष्ट्राला

आधुनिक केसरी



कड्याकपारी महाराष्ट्राच्या
भगवा फडकविला शुरांनी,
महाराष्ट्राच्या ऐक्यासाठी
मृत्यूला कवटाळीले कित्येक
वीरांनी।करावे विलीन
महाराष्ट्रात मागणी ही
बेळगावकरांची,महापौराच्या
तोंडाला काळ फासलं फूस
कर्नाटक सरकारची,
भगवा उतरविला खाली,
सहनशीलताचं संपली मराठी भाषकांची।
नित्याचंचं झालं सीमावादाचं राजकारण,
यात बळी पडते मराठी माणूस विनाकारण।
बेळगावकरांनी केलं आवाहन द्या साथ आम्हाला,
सन्मानाने जोडून घ्या शिवरायांच्या महाराष्ट्राला,
शिवराय दैवत आमचं ठाऊक सर्व भारतीयांना।
सीमावर्ती भागात अन्यायाची वागणूक मिळते आपल्या
सुपुत्रांना, करतो आवाहान आम्ही सह्याद्रीच्या विशाल
भुजांना।
द्या समजदारीच्या इशारा कर्नाटक व केंद्र सरकारला,
बेळगाव अस्मिता मराठी भाषिकांची,शान आहे
महाराष्ट्राची, केंद्र सरकारने सामंजस्याने सीमावाद
सोडवावा,बेळगाव पुन्हा पवित्र महाराष्ट्र भूमीला जोडावा,
ऐक्य व प्रयत्नचं सोडविल अन्यायी जाचातून आम्हाला,
सह्याद्री देईल पुन्हा जीवन स्वाभिमानाने जगण्याला।
सह्याद्री देईल पुन्हा जीवन स्वाभिमानाने जगण्याला।।

-रवी दगू सगर
शिंगवे, ता.निफाड
मो.९०४९२८०७९१

# कथा लिहिल्याने संवादकौशल्य सुधारते

## विनोद जैतमहाल यांची कथालेखन कार्यशाळा संपन्न




आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** कथालेखनाचा सराव केल्यास संवादकौशल्यासह शैक्षणिक व व्यावसायिक लेखन सुधारते आणि कल्पनाशक्तीचाही विकास होतो, असे प्रतिपादन जालना येथील कवी, लेखक विनोद जैतमहाल यांनी केले.

अंबडमधील आर. पी. इंटरनॅशनल स्कूल येथे दि. 1 डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी कथालेखन कार्यशाळेत ते बोलत होते.

इंग्रजी पंधरवड्यानिमित्त आयोजित या कार्यशाळेस मुख्याध्यापक चंद्रशेखर जगताप, शिक्षक सतीश लिंगडे, सुमीत शर्मा, संजय भिंगारे, नीलेश सपकाळ, श्याम पवार, उग्रसेन, नायक, श्रीमती ममता, श्रीमती प्रियंका, श्रीमती अंजुम, अमोल चिखले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेत विनोद जैतमहाल यांनी सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना कथालेखनाचे तंत्र सविस्तर सांगितले. केवळ विविध घटनांची साखळी म्हणजे कथा नसते. त्यात कथेची पाच मूलतत्त्वे असावी लागतात. तरच ती कथा होते. कथासूत्राचे मुख्य प्रकारही त्यांनी सांगितले. या प्रकारांपैकी एका तरी कथासूत्रावर सिनेमा, नाटक किंवा मालिकेची कथा लिहिलेली असते.

या कार्यशाळेदरम्यान काही कथा सांगून त्यांचे विश्लेषणही त्यांनी करून दाखवले. तसेच राघव सोमाणी या विद्यार्थ्यानेही एक कथा सांगितली. सूत्रसंचालन गौरी गिल्डा हिने तर आभार प्रदर्शन अक्षरा धानुरे हिने केले.

# जी २० परिषद : सर्वपक्षीय बैठकीस गैरहजर राहून उद्धव ठाकरे यांच्याकडून महाराष्ट्राचा अपमान

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जगातील प्रगत राष्ट्रांच्या जी २० परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे आले असून त्या निमित्ताने राज्याचा विकास आणि आपली संस्कृती जगासमोर मांडण्याची संधी आहे. या संदर्भात आयोजित सर्वपक्षीय बैठकीला केंद्र सरकारने माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना निमंत्रण देऊनही ते बैठकीस उपस्थित राहिले नाहीत. महाराष्ट्राच्या हितापेक्षा स्वतःच्या राजकारणाला महत्त्व देऊन उद्धव ठाकरे महाराष्ट्राचा अपमान केला आहे, त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी नवी दिल्ली येथे पत्रकारांशी बोलताना केली.

चंद्रशेखर बावनकुळे पक्षाच्या उच्चस्तरीय संघटनात्मक बैठकीसाठी नवी दिल्ली दौऱ्यावर आहेत. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या चार ठिकाणी जी २० परिषदेच्या १४ बैठका होणार आहेत. यानिमित्ताने राज्यातील विकासाचे प्रकल्प आणि आपली संस्कृती जगासमोर मांडण्याची संधी आहे. जी २० परिषदेच्या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी दिल्ली येथे सोमवारी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. त्याला भाजपाखेरीज इतर अनेक प्रमुख पक्षांचे नेते उपस्थित होते. परंतु निमंत्रण देऊनही उद्धव ठाकरे उपस्थित राहिले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना निमंत्रण होते. त्यांना काही कारणाने उपस्थित राहता आले नसेल तर पक्षाच्या वतीने विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी उपस्थित रहायला हवे होते. पण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या या दोन्ही नेत्यांनी बैठकीस गैरहजर राहून महाराष्ट्राचा अपमान केला आहे. त्यांनी माफी मागितली पाहिजे. जी २० संबंधी बैठकीसाठी विविध पक्षांना निमंत्रण होते. बैठकीस भाजपाचे विरोधक असलेले काँग्रेस, ममता बॅनर्जींची तृणमूल काँग्रेस, बिजू जनता दल अशा पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले पण उद्धव ठाकरे आणि शरद पवार गैरहजर राहिले, याविषयी प्रतिक्रिया काय असे विचारले असता मा. प्रदेशाध्यक्षांनी वरील मतप्रदर्शन केले.

ते म्हणाले की, महाराष्ट्राला या परिषदेतून खूप काही मिळणार आहे. अशा वेळी उद्धव ठाकरे आणि अजित पवार का उपस्थित राहिले नाहीत, हे त्यांनी सांगितले पाहिजे. या बैठकीच्या ऐवजी उद्धव ठाकरे दिवसभर प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत आणि महाविकास आघाडीची बैठक यात गुंतलेले राहिले. या बैठका नंतरही झाल्या असत्या. महाराष्ट्राच्या हिताच्या महत्त्वाच्या बैठकीस गैरहजर राहणे हा राज्याचा अपमान आहे. हे निषेधार्ह आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# सीमावादाचे सावट

आधुनिक केसरी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्नी पडसाद उमटण्याची शक्यता आहे. शिवसेनेतील ठाकरे गटाचे खासदार सभागृहात याप्रश्नी आवाज उठवण्याची शक्यता आहे. त्याचवेळी शिंदे गटाचे खासदारही या प्रश्नावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेण्याच्या तयारीत आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाप्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्यानंतर आज राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेतली आणि महाराष्ट्रातील सर्व खासदारांनी या प्रश्नी केंद्रीय मंत्र्याची भेट घ्यावी असे आवाहन केले होते. तर ठाकरे गटाच्या खासदारांनी यावर संसदेत आवाज उठवण्याची तयारी सुरू केली आहे. बुधवारपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. त्याचवेळी महाराष्ट्र आणि कर्नाटचा सीमाप्रश्न पुन्हा एकदा तापल्याचे चित्र आहे. शिंदे गटाचे खासदार या प्रश्नी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देणार आहेत. दुसरीकडे ठाकरे गटाचे खासदार हे या प्रश्नी आक्रमक आहेत. संसद अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ते कर्नाटकच्या दडपशाहीविरोधात आवाज उठवण्याच्या तयारीत आहेत. महाराष्ट्रातील सोलापूर आणि सांगलीतील काही गावांवर कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी दावा केल्यानंतर सीमाप्रश्न पुन्हा एकदा तापल्याचं चित्र आहे. त्यानंतर महाराष्ट्राच्या नेत्यांनी यावर आक्रमक भूमिका घेत कर्नाटकचा निषेध केला. आता कर्नाटकच्या कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी बेळगावच्या जवळ महाराष्ट्रातील ट्रकवर दगडफेक केल्याची घटना घडली आहे. कन्नड संघटनांच्या या कृत्यामुळे आता महाराष्ट्रात संतापाची लाट उमटल्याचं चित्र आहे. कन्नड संघटनांच्या या कृत्यामुळे कोल्हापुरात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेनेच्या वतीने कोगनोळी टोलनाक्याजवळ आंदोलन करण्यात येत आहे. सीमाप्रश्नी कर्नाटकच्या आततायी भूमिकेवर महाराष्ट्रात संतापाची लाट उठल्याचे दिसत आहे. यावर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रियाल दिली आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्रात सध्याचे सरकार हे लाचार सरकार आहे. या सरकारला पाय नसून खोके आहेत. मुख्यमंत्री ज्या खुर्चीवर बसलेत त्या खुर्चीवरुन महाराष्ट्राचा अपमान केला जात आहे. महाराष्ट्र पेटला तर सरकारला ते भारी पडेल. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, "मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी सीमा भागातील परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष दयावे. परिस्थिती लवकर सुधारली नाही तर पवार साहेब पोहचण्याआधी राष्ट्रवादी युवक काँग्रेस गनिमीकाव्याने बेळगावच्या स्थानिक मराठी भाषिक लोकांना साथ देण्यासाठी तिथे जाणार



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# नक्षलवाद्यांना प्रेरणा कोणाची ?

आधुनिक केसरी

**नुकतेच महाराष्ट्रातील शहरी नक्षलवाद्यांना नुकतेच जामीनवर सुटले आहेत.पण नक्षवाद्यांना प्रोत्साहन देणाऱ्यात प्रतिष्ठीत विचारवंत असतात, हे सर्वांना माहित आहे.या शहरी नक्षवाद्यांना तथाकथित पुरोगामी समजणाऱ्या विद्रान मंडळीचे काही पत्रकार समर्थन करत असतात.छत्तीसगड राज्यात बस्तर जिल्ह्यात बिजापूर येथेनक्षलवाद्यांनी संरक्षक दलातील पोलिस शिपायांना क्रूरपणे ठार मारल्याची घटना घडली होती.या हल्यात २२ सुरक्षा जवान शहीद झाले,तर राकेश्वरसिंह जवानांचे नक्षलवाद्यांनी अपहरण केले होते,नंतर सोडून दिले.हेच कृत्य जर पाक अतिरेक्यानी केले असते तर आपले रक्त उसळून उठले असते.**

या कृत्याचा बदला घेतला पाहिजे,अशी भावना व्यक्त केली असती.पण नक्षलवाद्यांच्या हिंसक कृतीला स्वातंत्र्यानंतरही स्वीकार करत आहोत.' केवळ असे व्हायला नको होत" अशीच प्रतिक्रिया व्यक्त करून सोडून देत आहोत. याचे कारण नक्षलवाद्यांच्या चळवळीत आपलेच भारतीय तरूण आहेत.नक्षलवादी समर्थक 'चळवळ' अथवा 'क्रांती' व गोडस नाव दिलेले आहे.या नक्षलवादी चळवळीचा इतिहास असा आहे. पश्चिम बंगाल राज्यातील 'नक्षलवाडी' गावात १९६०च्या दरम्यान तेथे जमीनदाराच्या विरोधात आंदोलन करण्यात झाले होते.या आंदोलनाचे नेतृत्व चारू मुजमदार आणि कानू सन्याल यांनी केले होते. त्यावेळी सोनम वांगडी या पोलीस निरीक्षकाच्या हातून आदिवासी तरूणांचा मृत्यू झाला.नंतर मुजमदारांनी १९६९ साली चळवळीची राजकीय आघाडी कम्युनिस्ट पार्टी ( मार्क्सिस्ट- लेनिनिस्ट) ची स्थापना केली.तसेच ७० व्या दशकात आंध्रप्रदेशात पेशाने शिक्षक असलेल्या कोंडापल्ली सीतारामय्या यांनी आदिलाबाद,वरंगल,तेलगंणा भागात या चळवळील बळ दिले.मजूमदाराने सुरु केलेली नक्षलवादी चळवळ देशात वणव्या सारखी पेटली. आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रातील ६० जिल्हे आज प्रभावित आहेत.महाराष्ट्रातील गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात नक्षलवादी चळवळ कार्यरत आहेत. आदिवासी बहूल लाल पट्यात ही चळवळ केंद्रीत झाली आहे.भारतीय गुप्तचर संस्थेच्या माहिती नुसार वीस हजार सशस्त्र नक्षलवादी व पन्नास हजार सक्रिय कार्यकर्ते आहेत.केंद्र सरकारने नक्षलग्रस्त भागात शिक्षण,रोजगार आरोग्य सुविधा,विकास कामावर भर देत.तसेच केंद्रात आदिवासी भागात जुलूम कार्यक्रम घेतला होता.त्यामुळे आजही नक्षलवदी चळवळ कमजोर होत चालली आहे. या नक्षलवादी चळवळीला सुशिक्षित मंडळी लेखक, विचारवंत प्रोत्साहन देत आहेत.त्यांना शहरी नक्षलवादी म्हंटले जाते.यांचा हिंसक घटनेत थेट संबंध नसला तरी ते प्रेरणास्थान म्हणून त्यांचे कार्य चालू असते.ही मंडळी आता देशातील बंगलोर मुबंई, पुणे, नासिक,मोठ्या शहरात



राहून नक्षलवादी चळवळीला प्रोत्साहन देत आहेत.गरीब, शेतमजूर, कामगार आणि आदिवासींच्या दुर्देशास देशाचे भांडवलशाही धोरण कारणीभूत आहे.त्याचा विरोध माओने दाखवून दिलेल्या सशस्त्र क्रांतींच्या मार्गाने करता येईल,ही नक्षलवादी गटाची विचारसरणी आहे.चीनमधील कम्युनिस्ट क्रांतीचे आद्य नेते त्से तुंग याचे प्रसिध्द वाक्य आहे,"क्रांती म्हणजे मेजवाणी नव्हे, अथवा सुंदर निबंध लिहिणे नव्हे तर क्रांती ही सत्ताधिकाऱ्यांच्या विरोधातील सशस्त्र उठाव आहे"याच विचाराने प्रेरित होवून हे हिंसक घटना केल्या जात आहेत. त्यासाठी सरकारच्या विरोधात रक्तरंजित लढाई करण्याशिवाय पर्याय नाही,अशी तथाकथित विचारवंताची मानसिकता आहे.नक्षलवाद्यांना समर्थकांना मोआवादी विचारसरणी मान्य आहे.पण भारताला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घटना,लोकशाही पध्दत मान्य नाही, असे दिसते.हेच शहरी नक्षलवादी विचारवंत मंडळी गरीब,आदिवासी तरूणांचे माथे भडकवितात. अश्या भरकटलेल्या तरूणांचे 'ब्रेन वाश' करून त्यांच्या हातात शस्त्र देत आहेत.स्वतः मात्र शहरी भागात उच्चभ्रू वस्तीत प्रतिष्ठीत म्हणून राहतात.या चळवळीसाठी खंडणी स्वरूपात परदेशातून देणगी स्वरूपात पैसा घेतला जात आहे.आंतराष्ट्रीय अतिरेकी संघटनेपेक्षा देशातील अंतर्गत अतिरेकी व विचारांपासून अधिक धोका आहे,याची आपणाला चिंचा वाटत नाही.देशात नक्षलवाद्यांची रक्तरंचित क्रांती घडू द्यावयाची नसेल तर काँग्रेसला निवडून द्यावे,असे श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये आंध्र प्रदेशच्या विधानसभा निवडणूक दरम्यान करिमनगर जिल्ह्यातील जगत्याल प्रचार सभेत केले होते.याच नक्षवाद्याच्या टोळीने मध्यप्रदेश काँग्रेसची प्रदेशाध्यक्षाची हत्या केली होती. या नक्षवाद्यांनी क्रांतीच्या नावाने हजारो सुरक्षा जवानांचे, राजकीय नेत्यांचे निष्पाप लोकांचे बळी घेतले आहेत. यात २०१६-४५०, २०१७- ३३३, २०१८- ३३ जणांचा नक्षलवाद्याच्या हल्यात बळी घेतला आहे. निष्पाप लोकांचे बळी घेवून त्यांचे क्रांतीचे स्वप्न भारतात कधीच पूर्ण होणारे नाही.नक्षलवादी विरोधातील आखणी चुकीची होती,असे विधान काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी केले आहे. त्यांनी नक्षलवादी चळवळीच्या विरोधात प्रतिक्रिया दिलीनाही.पण त्यांनी शहीद शिपायांच्या शौर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करून त्यांचा अवमान केलेला आहे.काँग्रेसचे हे 'बाबा' या घटनांकडे सुध्दा राजकीय चष्म्यातून बघतात. शहीद सैनिकांचा अपमान करणे, त्यांची सवय बनली आहे.ते देशातील सुरक्षा दलातील तज्ज्ञ नाहीत.नक्षलवादी चळवळी विरोधात सैनिक बळाचा वापर करून खात्मा करता येतो,पण आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकाराचे उल्लंघनाचा दवाब येत असतो.देशात अतिरेक्यांना पोलीस चकमकीत ठार मारल्यानंतर त्या विरोधात काँग्रेस पक्षाने आणि मानवाधिकार संघटनेने असंख्य तक्रारी नोंदविल्या आहेत.देशात भाजपा सरकारने शहरी नक्षलवाद्यांना अटक करून त्यांचा भांडाफोड केला होता.भीमा -कोरेगाव येथील दोन समुहात दंगल घडवून आणण्याची घटना घडली. अनिल तेलतुबंडे,वरावरा राव,गौतम नवलखा,सुधा भारव्दाज हे विचारवंत कोण आहेत? यांचा नक्षलवादी चळवळीशी सबंध आहे? काँग्रेस मानवाधिकार संघटना व समर्थकांनी या अटकेचा विरोध का केला होता? महाराष्ट्राच्या सीमेलेगत असलेल्या आंध्रप्रदेशात नक्षलवादी चळवळीचा एकेकाळी प्रभाव होता, आता या राज्यात ही चळवळ संपली आहे.पण महाराष्ट्रात चंद्रपूर,गडचिरोली भागात या चळवळीचा प्रभाव असून दिसून येतो.या चळवळीचा खात्मा करावयाचा असेल तर केंद्र व राज्य शासानाला संयुक्त प्रयत्न करावे लागतील.नक्षलग्रस्त भागातील जनतेचा विश्वास संपादन करावा लागेल.




प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शेवटचा संदेश

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव क्रांतीसुर्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा सूर्य 6 डिसेंबर 1956 साली अस्तास गेला म्हणजे त्यांचे महापरिनिर्वाण झाले. 24 ,अलीपुर रोड, नवी दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी या क्रांतीसूर्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखोंचा जनसमुदाय लोटला होता. त्यांचा अंत्यविधी कुठे करावा असा प्रश्न निर्माण झाला होता. माईसाहेब म्हणत होत्या की, त्यांचा अंत्यविधी सारनाथला करावा तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कर्मभूमी ही मुंबई आहे त्यामुळे त्यांचा अंत्यविधी मुंबईतच करावा अशी आग्रही भूमिका अनेक कार्यकर्त्यांनी घेतली. सारनाथ हे ठिकाण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अंत्यविधीसाठी योग्य नसल्याचे पंडित नेहरूंनीही सांगितले होते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा म्हणजेच या देशातील करोडो पददलितांचा उद्धारकर्त्याचा पार्थिव देह अखेर 6 डिसेंबर 1956 रोजी सायंकाळी दिल्लीहून 'डेकोटा' नावाच्या विमानाने मुंबईला आणण्यात आला. तोपर्यंत ही बातमी सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली होती.**

दिल्लीहून विमान मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावर 7 डिसेंबर 1956 रोजी 1. 50 मिनिटांनी उतरले .इकडे मुंबईत लाखोंचा जनसमुदाय विमानतळावर होता तर लाखोंचा जनसमुदाय त्यांच्या 'राजगृह' निवासस्थानावर होता. येणाऱ्या माणसांची रीघ चालूच होती. ज्यांना जसे जसे कळले तसे तसे सारे लोक आपल्या काळजाला पाहण्यासाठी आले होते .अनेकांचे पाय थरथरत होते. अनेकांचे पाय जागेवरून उचलता उचलत नव्हते. हा धक्का त्यांना पेलवत नव्हता अनेक जण ओक्साबोक्शी रडत होते. सगळा महाराष्ट्र मुंबईला आपल्या प्राणप्रिय नेत्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आला होता .अनेकांच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहत होते. आपल्या या उद्धारकर्त्याचे महानिर्वाण झाले होते. खरे तर हे अनेकांना सहन न होणारे न पेलणारे दुःख होतं. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः अनेक दुःखे सहन केली आणि इथल्या मृतप्राय जीवन जगणाऱ्या माणसांना एक नवीन जीवन दिले. शोषणाविरुद्ध लढणारा, बंड पुकारणारा हा एक शूर लढवय्या आपल्यातून निघून गेला होता याचे दुःख साऱ्यांना झाले होते. त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी सगळ्यांनी त्यांच्या कार्याची महती जाणून घेऊन आपल्या विचारांची, कार्यांची आणि आचरणाची दिशा ठरविली पाहिजे. कोणापुढे कधीही न झुकणारा ,कोणापुढे हार न मानणारा आणि स्वाभिमानाने जीवन जगणारा आपला लढवय्या कसा होता? हे नेहमी तनात आणि मनात ठेवून आपल्या जीवनाचे, समाजाचे आणि मानवी मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी झटायला हवे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्यात नाहीत परंतु त्यांनी जे काही समग्र मानवी उत्थानासाठी कार्य केले आहे ते मात्र कोणत्याही जातीधर्मातील माणसाने आपल्या काळजावर कोरून ठेवण्यासारखेच आहे. त्यांनी केलेले कार्य कोणत्याही एका जाती धर्मासाठी नव्हते तर त्यांचे कार्य समग्र मानवाच्या कल्याणासाठी होते. मानवी मुल्य प्रस्थापित करण्यासाठी होते. प्रत्येक मानवाने तयांचे कार्य लक्षात घ्यायला हवे पण आजही जाती-धर्मांने पछाडलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य काहीच न वाचणारे केवळ त्यांच्याकडे अंधत्वाने आणि जातीचा चष्मा लावून बघताना अनेकजण दिसतात .त्यांना एकाच जातीत अडकविण्याचा प्रयत्न करून त्यांच्या विचारांना आणि कार्याला सीमित करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. मानवी जीवन सुखकर करण्यासाठी ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्या त्या मानवाला मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी आपले सारे आयुष्य खर्ची घातले. अशा बाबासाहेबांच्या कार्याला मात्र इथल्या प्रत्येक माणसाने बेईमान होता कामा नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारासाठी प्रत्येकाने तन मन आणि धनाने झटायला हवे. आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना व कार्याला उजेडात येऊ न देण्याचा अनेक जण जाणूनबुजून प्रयत्न करत आहेत.त्यांचा अनुयायी ही थोडा आपल्याच विचारात गर्क झाल्यास सारखा दिसतो आहे. त्यांचे कार्य त्यांचे विचार इतर जातीतील लोकांनीही अंगीकारायला हवेत. त्यांच्या विचारांचा व कार्याचा प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणार नाही त्याच्यासाठी तर अनेक जणांनी कंबर कसलेली दिसत आहे. शाळा-कॉलेज अभ्यासक्रम, वृत्तपत्र इत्यादी मधूनही त्यांच्या कार्याला ,विचाराला मोठ्या प्रमाणात डावलले जात आहे पण हे त्यांनी लक्षात ठेवायला हवे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा स्वार्थाचा किंवा स्वजातीच्या कल्याणाचा नाही तर अखंड मानव जातीच्या कल्याणाचा आहे. तो विचार परिवर्तनाचा आहे. तो विचार क्रांतीचा आहे तो विचार स्वाभिमानाचा आहे.तो विचार जीवन प्रकाशमान करण्याचा आहे. तो विचार स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचा आहे. तो विचार विषमतेला,शोषणाला वर्णव्यवस्थेला, जातीव्यवस्थेला मूठमाती देणारा आहे .तो विचार जागृतीचा तो विचार स्वसन्मानाचा व



प्रतिष्ठेचा आहे हे प्रत्येकाने ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे तो विचार डांबून ठेवण्यात किंवा सिमित करण्यात काहीच अर्थ नाही. तसे करणाराने करूही नाही .कारण एक ना एक दिवस प्रत्येकाला त्या विचारांची गरज पडणार आहे. त्यामुळे ते विचार जितके डांबून ठेवण्याचा प्रयत्न केला तर ते विचार उफाळून आल्याशिवाय राहणार नाहीत. हेही लक्षात घ्यायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी 31 जुलै 1956 रोजी संध्याकाळी नानकचंद रत्तू दिवसभरात आलेले टपाल घेऊन बाबासाहेबांकडे गेले.काहीवेळ नानकचंद रत्तूला बाबासाहेबांनी डिक्टेशन दिले. परंतु मध्येच त्यांना झोप लागल्यासारखी झाली. थोड्या वेळाने त्यांना जाग आली.रत्तूंनी त्यांना वाचून दाखवले. बाबासाहेब रत्तूच्या खांद्यावर हात ठेवून ते झोपायच्या खोलीत गेले. अंथरुणावर ते झोपले. त्यांच्या हातातलं पुस्तक बाजूला पडले.काही वेळ ते शांत राहिले काही बोलले नाहीत. त्यामुळे नानकचंद रत्तू घाबरून गेले. त्यांच्याजवळ गेले. पायाला त्यांनी मसाज केले. त्यांनी घाबरत घाबरत बाबासाहेबांना विचारले," सर,अलीकडे आपण एवढे दुःखी आणि खिन्न का दिसता? अधूनमधून डोळ्यातून पाणी का गाळता? मी तुम्हाला हे विचारल्याबद्दल सर ,आपण मला क्षमा करा. पण मला आज ह्या प्रश्नाचे उत्तर द्याच." असे विचारल्यानंतर बाबासाहेबांकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. पण थोड्या वेळाने बाबासाहेब म्हणाले ,"नानकचंद तू माझ्या लोकांना सांग की मी त्यांच्यासाठी जे काही मिळवून देऊ शकलो ते मी एकट्याच्या बळावर मिळवले आहे. ते करताना पिळवटून टाकणाऱ्या संकटाचा आणि अनंत अडचणीचा मुकाबला मला करावा लागला. सगळीकडून विशेषतः हिंदू वृत्तपत्रसृष्टीकडून माझ्यावर शिव्या शापांचा वर्षाव सतत होत राहिला. जन्मभर मी माझ्या विरोधकांशी संघर्ष केला. माझ्या स्वतःच्या काही लोकांनी मला गंडविले, त्यांच्याशी मी दोन हात केले. मी माझ्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत देशाची आणि पददलितांच्या सेवा करीतच राहीन. हा काफला आज जिथे दिसतो तिथे त्याला आणता आणता मला खूप सायास पडले .हा काफला असाच त्यांनी पुढे आणखी पुढे चालू ठेवावा. वाटेत अनेक अडथळे येतील ,अडचणी येतील तर कल्पित संकटे कोसळतील पण वाटचाल सुरूच ठेवावी.त्यांना जर सन्मानाने प्रतिष्ठापूर्ण जीवन जगायची इच्छा असेल तर हे आव्हान त्यांनी पेलायला पाहिजे. जर माझे लोक, माझे सहकारी हा काफला पुढे नेण्यास असमर्थ ठरलेच तर किमान तो आज जेथे आहे तेथे तरी त्यांनी त्यास राहू द्यावे. कोणत्याही परिस्थितीत तृयांनी या काफल्यास परत फिरू देऊ नये. हा माझा संदेश आहे. बहुधा शेवटचा संदेश आहे. मी तो अत्यंत गंभीरपणे देत आहे. आणि या गांभीर्याला नजरेआड केले जाणार नाही अशी खात्री मला वाटते. जा आणि सांग त्यांना; जा आणि सांग त्यांना ;जा आणि सांग त्यांना." अशा प्रकारचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश आहे. तो डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे कार्य हे केवळ स्वतःच्या जातीपुरते मर्यादित नाही तर संबंध मानवजातीच्या कल्याणाचे आहे .भारतीय संविधानाच्या माध्यमातून तर सर्व माणसांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायाने व इतर सर्वांनी लक्षात ठेवूनच कार्याची वाटचाल करायला हवी.खरे तर आज राज्यकर्त्यांकडून, लोकशाहीच्या चार स्तंभाकडून,अधिका-यांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आणि संविधानाची मोडतोड केली जाते आहे. त्यामुळे सामान्यांचे जीवन धोक्यात आले आहे. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रूढी, परंपरा, जात, धर्माविरुद्ध आयुष्यभर लढा दिला त्याचे स्तोम मोठ्या प्रमाणावर मुद्दामच माजवले जात आहे अन् ते देशासाठी घातक आहे. हे प्रत्येकाने लक्षात घेऊन कार्य करायला हवे. एवढेच महापरिनिर्वाण दिनानिमित्त सांगावेसे वाटते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दत्तपंथातील उत्क्रांतीचा टप्पा योगी दत्तात्रेयाचा !



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

_दत्तात्रेय म्हणजेच श्री दत्त हा आद्य देवतांपैकी एक आहे. त्याचा उल्लेख वेदात आहे. रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांतपण त्याचा उल्लेख आहे. ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रीकरण करून दत्तात्रेयाचे दैवत झाले असल्याचे मानले जाते. त्रिमूर्ती कल्पनेचे ते आद्य प्रतीक आहे. सर्व देवतांचे गुरू म्हणूनही त्याच्याकडे पाहिले जाते. श्रीगुरू दत्तात्रेय आणि भगवान शंकर यांच्या कृपाप्रसादाने व प्रेरणेने मच्छिंद्रापासून नाथसंप्रदायाचा प्रारंभ झाला. दत्तात्रेय हा विष्णूचा सहावा- कदाचित चौथा किंवा सातवा अवतार समजला जातो. श्री दत्त जयंतीनिमित्त श्रीकृष्णदास निरंकारी- बापू यांचा हा अभ्यासपूर्ण लेख.

दत्तात्रेय उपनिषदाची सुरूवात म्हणजे दत्तात्रेय हा विष्णूचा अवतार आहे, असे सांगून होते. तर शेवट ॐ नमः शिवाय या शिवाच्या प्रार्थनेने होते. नाथपंथीय भक्त दत्तात्रेयाला शिवाचा अवतार मानतात. मध्ययुगीन काळातील हरिहर भक्तीचा हा दत्तपंथ आहे. विष्णू आणि शिव या दोन देवतांचा अर्थात वैष्णव आणि शैव पंथांचा समन्वय करण्याचे काम या पंथाने केले. भक्ती आणि योग यांचाही समन्वय या पंथाने केला. इस्लाम प्रभावामुळे समाज सुन्न झाला होता. या नवीन संकटाला प्रतिक्रिया कशी द्यावी, हे त्याला समजत नव्हते. त्या पाश्वभूमीवर नृसिंह सरस्वती यांचे कार्य पाहिले पाहिजे. भागवतात नवनारायणाची कल्पना आहे. नारायणाचा अंश असलेले व नारायणाप्रमाणे कार्य करणारे म्हणून त्यांना नवनारायण असेही म्हणतात. ज्ञानेश्वर- नामदेवांनंतर एकनाथांपर्यंत म्हणजे तेराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत जवळजवळ २००-२५० वर्षे कोणीही मराठी संत झालेला दिसत नाही. संत नामदेव ते संत एकनाथांपर्यंत- इ.स.१५५०पर्यंत म्हणजे जवळजवळ दोन शतके महाराष्ट्रात नृसिंह सरस्वतींशिवाय एकही संत झाला नाही. इस्लाम प्रभावामुळे समाज सुन्न झाला होता. या नवीन संकटाला प्रतिक्रिया कशी द्यावी, हे त्याला समजत नव्हते. त्या पाश्वभूमीवर नृसिंह सरस्वती यांचे कार्य पाहिले पाहिजे. श्रीपाद वल्लभ व त्यांचे शिष्य नृसिंह सरस्वती या दोन महान व्यक्तींनी केलेले कार्य म्हणूनच अद्वितीय म्हणावे लागेल.

दत्तात्रेय म्हणजेच दत्त हा आद्य देवतांपैकी एक आहे. त्याचा उल्लेख वेदात आहे. रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांतपण त्याचा उल्लेख आहे. ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रीकरण करून दत्तात्रेयाचे दैवत झाले असल्याचे मानले जाते. त्रिमूर्ती कल्पनेचे ते आद्य प्रतीक आहे. दत्तात्रेय हा विष्णूचा सहावा- कदाचित चौथा किंवा सातवा अवतार समजला जातो. दत्तात्रेय हा अत्री ऋषी आणि अनुसूया यांचा पुत्र होय. त्याचा जन्म मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला झाला, असे मानतात. त्यांनी आदिनाथांकडून दीक्षा घेतल्याचे नाथपंथ सांगतो, तर भागवत पुराणात त्याला चोवीस गुरू असल्याचे सांगितले आहे. तेथे त्यांच्या शिष्यांत सहस्रार्जुन कार्तवीर्य, परशुराम, यदु, आलार्क, आयु आणि प्रल्हाद हे असल्याची नोंद आहे, तर परंपरेप्रमाणे धुंडिसुत मालू या कवीने लिहिलेल्या नवनाथ सार ग्रंथात त्याने मत्स्येंद्रनाथांसह इतर नाथांना दीक्षा दिल्याचे सांगितले आहे. सर्व देवतांचे गुरू म्हणूनही त्याच्याकडे पाहिले जाते. श्रीगुरू दत्तात्रेय आणि भगवान शंकर यांच्या कृपाप्रसादाने व प्रेरणेने मच्छिंद्रापासून नाथसंप्रदायाचा प्रारंभ झाला. ऋषभदेव हा विष्णूचा कृष्णासमान अंश होता, असे जैनांचे ऋषभदेव ग्रंथात म्हटले आहे. यात त्याच्या शंभर पुत्रांपैकी नऊ जण हे वैराग्यसंपन्न, तेजस्वी, ज्ञानी व परमहंस स्थितीला पोहोचलेले होते. या आर्षभांची- ऋषभपुत्रांची नावे कवी, हरी, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविहरेत्र, द्रुमिल, चमक व करभाजन अशी होती. कलियुगात भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेने त्यांनी पुन्हा अवतार घेतले. या वेळी ते अनुक्रमे मच्छिंद्र, गोरख, जालंदर, कानीफ, चर्पटी, वटसिद्ध नागनाथ, भर्तरी, रेवण व गहिनी असे नवनाथ झाले. वैष्णव नवनारायणाचे रूपांतर शैव नवनाथात झाले, असे सांगितले जाते.

वेद आणि पुराणानंतर मध्ययुगीन काळात तंत्रानेही हे दैवत स्वीकारल्याचे दिसते. दत्तात्रेय हा औदुंबर वृक्षाखाली यज्ञकुंडासमोर गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगावर भस्माचे पट्टे, समोर चार कुत्री, दाढी वाढलेल्या नग्न अवस्थेत ध्यानस्थ बसलेला दिसतो. त्याचे चार कुत्री हे वेद मानले जातात. रुद्राक्ष, अंगावर भस्म यांवरून तो तंत्रातील स्मशानात राहणाऱ्या शिवाचे ध्यान करत असल्याचे दिसते. त्याची जटाजूट आणि नग्न अवस्था ही त्याने जगाशी संबंध तोडल्याचे द्योतक आहे. त्याच्या समोरील अग्निकुंड हे तंत्रातील अग्नीचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. त्याच्याबरोबर असलेली गाय हे संप्रदायावरील वैदिक परिणाम दर्शविते. एकंदर हे चित्र समाजात निषिद्ध मानलेल्या कृती करणाऱ्या तंत्रातील योग्याचे आहे. तंत्रात दत्तात्रेयांना गुरूचा गुरू मानले आहे. सातव्या शतकात लिहिल्या गेलेल्या मार्कण्डेय पुराणात सतराव्या- अठराव्या अध्यायात तांत्रिक दत्ताची आपल्याला गाठ पडते. त्यातील दोन गोष्टी तंत्राचा प्रभाव लक्षात येण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत- १.एका सरोवराकाठी आपल्या शिष्यांची नजर चुकवून आणि सर्व बंध तोडून सरोवराच्या तळाशी मुनी दत्तात्रेय जातात. त्यांचे शिष्य काठावर त्यांची वाट पाहात बसतात. मुनीवर येतात तेव्हा ते मद्यधुंद अवस्थेत एका सुंदर स्त्रीसमवेत वीणा वाजवत असलेले दिसतात. शिष्यांना आश्चर्य वाटत नाही. कारण तंत्रातील बंधनाच्या पलीकडे गेलेल्या तांत्रिकांची त्यांना माहिती असते. २.सहस्रार्जुन कार्तवीर्य अर्जुनाला त्याचे गुरू गर्ग दत्तात्रेयाची उपासना करण्यास सांगतात आणि दत्तात्रेयाची महती सांगतात. देव-दानवांच्या भांडणात देव पराभवाच्या छायेत येतात आणि ते ब्रह्मदेवाकडे मार्गदर्शनासाठी जातात. ब्रह्मदेव त्यांना दत्तात्रेयांकडे पाठवतात. देव दत्तात्रेयाकडे येतात तेव्हा दत्तात्रेय मद्यधुंद अवस्थेत स्त्रीसमवेत गाणे ऐकत असताना दिसतात. असे हे दैवत शत्रूचा कसा बरे नाश करू शकेल? असे देवांना वाटले आणि त्यांनी हा प्रश्न ब्रह्मदेवाला विचारला. तेव्हा ब्रह्मदेवांनी ही स्त्री लक्ष्मी आहे आणि दत्तात्रेय आपल्या नेत्रकटाक्षाने शत्रूचा निःपात करतील, असे सांगितले आणि पुढे झालेही तसेच! असे अनैतिक आणि समाजनिषिद्ध व्यवहार करणाऱ्या देवतेबद्दल सांगण्याचा उद्देश म्हणजे उघडच तंत्राचे समर्थन करण्याचा आहे. वामाचार हा फक्त दिव्य साधकांसाठी असतो. दिव्य साधक हा जीवनमुक्त असतो. तो चांगले-वाईट, भले-बुरे, ज्ञान-अज्ञान इत्यादी द्वैतांच्या पलीकडे गेलेला असतो. जे कर्म पशू किंवा वीर साधकांना बाधक होऊ शकते, ते दिव्य साधकांना बाधक ठरत नाही, हेच दाखवण्याचा उद्देश त्यात असावा. हा तांत्रिक दत्तपंथ सातव्या- आठव्या शतकातला असावा. यातील दत्तात्रेय हा वेदात असलेल्या दत्तात्रेयाप्रमाणे मिथॉलॉजिकल नसावा. तो ऐतिहासिक असण्याची शक्यता आहे. त्याच्यासंबंधी आपण पुढे पाहणारच आहोत. तंत्रात श्री दत्ताला अत्रीचा पुत्र न मानता अत्री गोत्रातील व्यक्ती मानलेले आहे. पुराणातील अर्जुन, कार्तवीर्य, परशुराम यांच्याशी मिथकांच्या साहाय्याने जोड घालण्यात आली आहे. त्रिपुरा रहस्य नावाने एक ग्रंथ दत्तात्रेयांशी संबंधित आहे. दत्तसंहिता किंवा दक्षिणामूर्ती संहिता यांचा हा भाग दत्तात्रेयांनी लिहिला असावा. परशुरामाने त्रिपुरा रहस्य नावाने त्याचे संक्षिप्त रूप केले असावे. दत्तात्रेयाने परशुरामाला निरनिराळ्या कथांद्वारे अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले आहे. मंत्र, यंत्र इत्यादींची माहिती त्यात आहे. त्रिपुरापद्धती हा आणखी एक ग्रंथ श्रीगुरु दत्तात्रेयांच्या नावाने आहे. या तंत्रातील श्री दत्त हा एकमुखी आहे. त्याची मंदिरे आजही भुताखेतादीपासून त्रस्त झालेल्यांसाठी व आजारापासून मुक्त होण्यासाठी वापरली जातात. उदा.गाणगापूर मंदिर हा तंत्राचाच परिणाम दिसतो. यानंतर दत्तपंथातील उत्क्रांतीचा टप्पा हा योगी दत्तात्रेयाचा आहे. गोरखनाथांनी अकराव्या शतकात आपला संप्रदाय स्थापन केला आणि त्यात अवधूत हे नाव जीवनमुक्त पुरुषाला दिले. अवधूत ही दत्तपंथातील शब्दावली गोरखपंथाने उचललेली दिसते. दत्तात्रेयास गुरूचा गुरू मानून दत्तात्रेयाला महायोगी ठरविलेले आहे. अवधूत गीता हा गोरखनाथ पंथाचा महत्त्वाचा ग्रंथ त्याच्याशी संबंधित आहे. जीवनमुक्त स्थिती आणि अवधूत स्थिती यांचे सविस्तर विवेचन त्यात आहे. हा दत्तात्रेयाच्या शिष्यांपैकी कोणीतरी लिहिला असावा. नाथपंथातून भक्तिपंथात श्री दत्त या देवतेचा प्रवेश बाराव्या शतकात झालेला दिसतो. महानुभवाच्या पंचकृष्णात दत्तात्रेयाचा समावेश आहे. मूळ विष्णूचे रूप असलेला दत्तात्रेय नाथपंथात शिव झाला; परंतु त्यानंतर तो हरि-हर स्वरूपात भक्तिपंथात आल्याचे दिसते. बाराव्या-तेराव्या शतकात निर्माण झालेले पंथ हे हरिहर समन्वयाचे दिसतात. नाथपंथातील गहिनीनाथांनी कृष्णभक्तीची दीक्षा निवृत्तिनाथ-ज्ञानदेव यांना दिली.



स्वधर्म आणि स्वसंस्कृती संकटग्रस्त असताना त्यांची जोपासना करण्याचे कार्य दत्त संप्रदायाने केले. दत्त संप्रदाय हा सगुणोपासक राहिला. एकमुखी दत्त आणि त्रिमुखी दत्त अशा दोन रूपांत त्याची पूजा केली जाते. श्रीपाद वल्लभ व नृसिंह सरस्वती या दोघांनी दत्तपंथाची पुनर्स्थापना केली, असे म्हणावयास हरकत नाही. यांचा मार्ग नाथपंथाप्रमाणे योगप्रधान होता; पण वर्णाश्रम धर्म मानणारा होता. नाथ संप्रदायात जे जातिव्यवस्था न मानण्याचे धोरण होते, त्याच्या विपरीत कदाचित त्याची प्रतिक्रिया म्हणून असेल, हा संप्रदाय अधिक कर्मठतेकडे वळला. स्त्रियांच्या बाबतीतही तो अनुदार राहिला. आचारधर्मावर व अनुष्ठानावर त्यांचा अतिरिक्त भर होता. कदाचित तत्कालीन मुसलमानांच्या प्रभावापासून आपल्या धर्माचे रक्षण करावे म्हणून अशी मूलतत्त्ववादी भूमिका त्यांनी घेतली असावी. हे दोघेही महापुरुष दत्ताचे अवतार समजले जातात आणि त्याच्यातूनच त्यांच्याविषयी भक्तिभावना बाळगणारा भक्तिमार्गी दत्त संप्रदाय सुरू झाला. सरस्वती गंगाधर नावाच्या त्यांच्या शिष्याने गुरुचरित्र नावाचा ग्रंथ लिहिला. सरस्वती गंगाधर विरचित गुरुचरित्र नावाचा हा ग्रंथ या पंथाचा प्रमाणग्रंथ ठरला. म्हणूनच याला गुरुचरित्र परंपरा म्हणतात. त्यात त्यांच्या चरित्राशिवाय तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची माहिती मिळते. गाणगापूर आणि नरसोबाची वाडी ही क्षेत्रे दत्त संप्रदायाकरिता श्रद्धेची बनली. महाराष्ट्रात, कर्नाटकात आणि आंध्रात दत्त संप्रदायाचा प्रभाव वाढला व त्याच्या अनेक परंपराही निर्माण झाल्या, हे उल्लेखनीयच!

# आष्टीचे श्रीदत्तमंदिर - श्रीरघुनाथमहाराज कालकुंद्रीकर



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

नमस्कार सर्वांना- श्रीदत्तजयंती "म्हटले की आठवण होते -आष्टीच्या दत्त मंदिराची , सद्गुरुवरूप श्रीरघुनाथ अनंत कालकुंद्रीकरमहाराजांची. श्रीदत्तजयंती निमीत्ताने पन्नास- पंचावन्न वर्षांपूर्वीच्या भावनिक आठवणींना नव्या पिढीसाठी उजाळा देतो आहे. मित्र हो - दत्तगुरूंची कृपासावली ज्यांच्या सहवासात लाभली ते सद्गुरू व्यक्तिमत्व - प.पु.रघुनाथ महाराज कालकुंद्रीकर . माझ्या आयुष्यात त्यांचे स्थान कायम "माझे मानसगुरू"" हेच आहे. अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त .." दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा " ,श्रीदत्तगुरूंचे हे नामस्मरण करण्याचा भाग्यदायक योग आमच्या परिवाराला पहिल्यांदा लाभला ,ते वर्ष होते १९६७.

पंचावन वर्षापूर्वी - म्हणजे १९६७ साली "स्टेट बँक ऑफ हैद्राबाद" या बँकेची नवी शाखा "आष्टी " उघडली.

माझ्या वडिलांची ती.व्ही.एच .देशपांडे उर्फ बाप्पा यांची या शाखेचे पहिले मॅनेजर म्हणून नियुक्ती झाली होती. हैद्राबादसारख्या मोठ्या शहरातून "एकदम छोट्या खेड्यात आलोत ", तो पर्यंत आम्ही इतके लहान गाव पाहिलेले नव्हते. त्यावेळी मी एचएससी पास झालेला १६ वर्षे वयाचा मुलगा, अंबाजोगाईला होस्टेलचा कॉलेज- विद्यार्थी झालो. सणवार आले की सुट्टीत आष्टीला घरी येत असे. उभी गल्ली"तल्या ना.वा .कुलकर्णी सरांच्या "श्रीमंताच्या वाड्यात आम्ही राहायचो.

गल्लीतून जाता-येता रस्त्यात लागणाऱ्या "दत्त मंदिराकडे लक्ष जायचे ,मंदिरात दर्शनास जाण्याची मनाला सवय नव्हती. पण श्रीदत्तमहाराजांनी मला फार दिवस दूर राहू दिले नाही दर्शनास जाण्याची मला सुबुद्धी झाली, आमचा परिवारही मग दत्तमंदिर परिवार झाला. तेव्हापासून माझ्या आयुष्याला सार्थक- वळण लागण्यास सुरुवात झाली. आम्ही आष्टीला येण्याच्या एक वर्ष आधीची गोष्ट - १९६६ साली कर्नाटकात असलेले परमपूज्य श्रीसद्गुरु रघुनाथमहाराज कालकुंद्रीकर श्रीदत्तगुरुंच्या आज्ञेने आष्टी येथे आले . व त्यांनी श्रीदत्त मंदिर स्थापन केले. या नंतर वद्य प्रतिपदा शके -१८८८ -शनिवार २५ फेब्रुवारी १९६७ रोजी सध्याच्या जागेतल्या मंदिरात श्रीदत्तमूर्तीची नव्याने स्थापना करण्यात आली. श्रीदत्तगुरूंचे हे "श्री शिवदत्तस्वरूप आहे" त्रिमुखातले मधले मुख "श्री शंकराचे आहे".अतिशय सुंदर मूर्ती आहे ही. "शिवदत्त दर्शन"घेतल्यावर मन प्रसन्न होऊन जाते.

आष्टी येथील ४ वर्षांच्या वास्तव्यात मी कॉलेजचा– विद्यार्थी होतो . या महत्वाच्या वळणावर श्रीरघुनाथ महाराजांचा सहवास लाभला ही दत्तगुरूंची कृपा होय. श्रीदत्त-मंदिरातील नित्य उपक्रमात मी हजेरी लावत असे.

दत्तगुरूंचे दर्शन , प्रदक्षिणा , श्रीस्वात्म –सौख्य "ग्रंथांची पारायणे "अशी गोडी लागली. मंदिरात रोज येणे , महाराज सांगतील ते काम करणे असा सेवेकरी" मी कधी झालो कळालेच नाही. आणखी एक महत्वाची गोष्ट, ज्यामुळे मला महाराजांचा सहवास लाभला -ती अशी की- रघुनाथमहाराजांचे चिरंजीव -सुरेश, तो देखील माझ्यासारखा कॉलेजकुमार .कॉलेज सुट्टीत तो पुण्याहून येत असे, मी अंबाजोगाईहून येई. आमची छान मैत्री झाली. सुट्टीतले सगळे दिवस आम्ही सोबत असायचो, एकमेकांच्या घरी गप्पा -टप्पा, जेवण करायचो. आमच्या मैत्रीमुळे श्रीरघुनाथमहाराज आणि गुरुमाऊली यांनी माझ्यावर "पुत्रवत माया केली, आमच्या परिवारावर त्यांची कृपादृष्टी होती.


सुरेश, मी आणि एक सेवेकरी मुलगा - कुंभाराचा विजू. 1967 ते 1971 असे चार वर्षे सतत सोबती होतो.

श्रीदत्त जयंती, श्री गुरुपौर्णिमा, श्रीमंदिर वर्धापन दिन तसेच रोज होणाऱ्या आरती, आणि प्रदक्षिणा "यात सुरेश, विजू, आणि मी तिघेजण असयचो. कॉलेज-सुट्टीत दुपारच्या निवांत वेळी श्रीरघुनाथमहाराज, गुरुमाऊली-वहिनी, सुरेश, बेबीताई आणि यांच्या सोबत मी असे , यावेळी महाराज आम्हाला जे सांगत, बोलत ते जीवनसार, संस्कारबोल असत. आम्ही आष्टी सोडल्यावरही ,१९८०-९० दरम्यान आष्टीला दर्शनयात्रा घडली .

प.पू. रघुनाथमहाराज शिष्यपरिवाराच्या भेटीसाठी परभणी, गंगाखेड या ठिकाणी येत. त्यावेळी महाराज आणि गुरुमाऊली वहिनी आम्हाला आठवणीने बोलावून घेत आणि या भेटीत सद्गुरूंची पाद्यपूजा करण्याचा योग आमच्या वाट्याला यायचा. त्यांचा असा कृपाप्रसाद , वत्सलमाया आणि स्नेह आम्हाला नेहमीच लाभला. उत्सवाच्या पत्रिकेसोबत त्यांचे आशीर्वाद १९९५ पर्यंत येत असत. २८ ऑगस्ट १९९६ रोजी श्री. रघुनाथ महाराज दत्तचरणी विलीन झाले. २००५ साली आम्ही आष्टीला गेलो तेव्हा दर्शन घेताना हे सगळे क्षण आठवून मन गलबलून आले.

गुरुमाऊली-वहिनींनी २५ वर्ष दत्तमंदिराची धुरा सांभाळली, याच काळात मंदिर-वास्तूचा ीर्णोद्धार ही झाला. १५ एप्रिल २०२१ रोजी गुरुमाऊली-वहिनी, दत्तचरणी विलीन झाल्या. २००६ मध्ये मी पुण्यात आलो, सुरेशच्या शास्त्रीनगर-नवी पेठ भागातील घरी मी जात असे. आष्टीला मंदिरात श्रीदत्त महाराजांच्याच्या समोर बसून ,त्याने माझ्या भक्तीकविता म्हटल्या, आणि फोनवरून मला ऐकवल्या. माझे लेखन त्याने श्री चरणी रुजू केले, ही मोठीच आठवण आहे. माझ्या हातून श्री सद्गुरूतत्व विषयक आणि आध्यात्मिक विषयक लेखन सिध्द होणे. ही सगळी श्रीदत्तगुरूकृपा आणि परमपूज्य रघुनाथमहाराज कालकुंद्रीकर यांचे आशीर्वाद आहेत.

जानेवारी २००० मध्ये माझे पुस्तक "संतकवी दासगणू महाराज वाङ्मयदर्शन -आस्वाद समीक्षा "प्रकाशित झाले, हे पुस्तक मी माझ्या मानसगुरुंना-प.पु.रघुनाथ महाराजांना अर्पण केले आहे.





प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

# युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक केसरी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असे एक थोर समाजसुधारक, समाजचिंतक आणि संस्कृती पुरुष होते ज्यांनी अमुलाग्र समाज परिवर्तन घडवून आणले. अनुसूचित जाती जमाती, दलित वर्ग आणि मागास जातीमध्ये नव्हे तर समाजाच्या प्रत्येक वर्गात त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत गेली ज्यांना पूर्वी दलितच आपले नेते मानत पुढे जाती आणि अल्पसंख्यांक समाजाचे लोकही त्यांनाच निर्विवादपणे आपला आदर्श नेता मानू लागले. उच्च-जातीतील ज्या लोकांचा राज्यघटनेवर विश्वास होता ते देखील बाबासाहेबांनाच आपला नेता मानू लागले. खरं तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे पर्यायवाची नाम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या अफाट ज्ञान आणि मेहनतीच्या बळावर समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यभर झटले.**

ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. तसेच देशभक्त आणि अर्थतज्ञ देखील होते. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू होते. शिवाय एक झुंजार पत्रकार, संपादक आणि लेखकही होते. त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत यामधून आपले विचार मांडले. लोकशाही राजकीय नीतिमत्ता शिक्षण या विषयावर सडेतोड भूमिका घेत परखड व प्रभावी विचार मांडले. १९२० साली ३१ जानेवारीला मूकनायक च्या पहिल्या अग्रलेखात त्यांनी म्हटले होते, 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या बोपुडे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांच्या भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमी नाही.' शेतीला उद्योग समजून आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर भर देताना शेतीचे शोषण करणारे "खोतीशाही" सारख्या शोषण यंत्रणेवर बाबासाहेबांनी खरपूज टीका केली व अद्यावत शेती सुधारण्याचा संबंध त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेची जोडला. बाबासाहेब म्हणाले होते की, 'सरकारमधील आरक्षणात जे लोक पुढे आहेत ते पुढे जातील; मात्र व्यापार शेतीवाडी आधी खाजगी क्षेत्रात आरक्षणाचा लाभ कोठे आहे?' त्यांच्या प्रत्येक विधानावर त्यांनी परिवर्तन घडवून आणण्याला भाग पाडले. पूर्वी आपल्या देशात मनुस्मृतीची एक चौकट होती. आणि समाजाला खंडित करण्याचे कामही त्या चौकटीत होत होते. बाबासाहेबांनी आपल्याला जी सक्षम राज्यघटना दिली त्या राज्यघटनेने समाजाला जोडण्याचे काम केले. मनुस्मृतीच्या माध्यमातून निर्माण झालेल्या वर्णव्यवस्थेअंतर्गत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांना वेगळे काम सोपवण्यात येत होते. शूद्रांमध्ये ही अस्पृश्य व बिगार अस्पृश्य अशी विभागणी झाली होती. एकाला स्पर्श करता येऊ शकतो तर दुसऱ्याला तो हक्क नाही. अशी ही व्यवस्था होती. त्यांच्यासाठी मनुस्मृतीमध्ये आक्षेपार्ह उल्लेख होता. अनेक शतके या मनुस्मृतीचे राज्य भारतावर होते. जातिव्यवस्थेमध्ये हा समाज दबलेला गुरफटून गेलेला होता. अस्पृश्य लोकांच्या सावलीची देखील घृणा होत होती. स्पर्श टाळला जात होता. त्यांच्या आवाजाला महत्व नव्हते, मुळातच त्यांचा आवाज दाबून टाकलेला होता. देशातील हा मोठा वर्ग प्रवाहापासून दूर राहिल्यामुळे त्याच्या अधिकारांचे सातत्याने हनन होत होते. बाबासाहेबांच्या चळवळीतून समाजातील प्रत्येक घटकाला त्याचा हक्क आणि न्याय मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते तर देशाला स्वातंत्र्य भलेही मिळाले असते; मात्र समाज विचारांच्या गुलामगिरीतून कधीच स्वातंत्र्य झाला नसता. बाबासाहेबांच्या संपूर्ण चळवळीत व लिखाणात एकच ध्यास होता तो म्हणजे भारतात जातीविरहित व वर्णविरहित समाज निर्माण करण्याचा व त्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या विचारांची मुळे भारतातील राज्यघटनेत परिवर्तित होताना दिसली. त्यामुळेच भारताचे राज्यघटना जगात सर्वश्रेष्ठ राजघटना बनली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रादेशिक वाद टाळण्यासाठी 'एक भाषा एक राज्य' हे सूत्र सुचवले पण त्यांची मागणी मान्य न करता 'एक राज्य एक भाषा' हे धोरण डोळ्यासमोर ठेवून राज्य पुनर्रचना आयोगाने 'एक राज्य एक भाषा' हे सूत्र स्वीकारले बाबासाहेबांनी लोकसंख्या हे सूत्र ठरविताना प्रत्येक राज्याची लोकसंख्या दोन कोटी ठरवावी व त्याचे प्रतिनिधित्व लोकसभेत द्यावे. त्यामुळे सर्व राज्याच्या विकासाला गती मिळेल शिवाय उत्तर विरुद्ध दक्षिण असा भाषावाद व प्रांतीयवाद होणार नाही असे ते म्हटले होते. राज्य निर्माण करते ना एकच भाषेचा त्यांनी आग्रह धरला तो यासाठी की हिंदी या राष्ट्रीय भाषेला न्याय मिळेल. बाबासाहेबांचे अनेकविध चपखल विचारांच्या लेखनातून मूलगामी चिंतन आढळते. 'शिक्षण ही स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे' असे बाबासाहेब मानत. व्यक्ती स्वातंत्र्याची कल्पना जर मान्य असेल तर दर एक व्यक्तींच्या ठायी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरूरी आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही असे त्यांचे विचार होते म्हणून शिक्षणाला देखील त्यांनी महत्त्व दिले. स्त्रियांचे शिक्षण पुरुषांबरोबर एकत्र असले पाहिजे. यावर त्यांचा कटाक्ष होता. तसा सहशिक्षणाचा त्यांनी आग्रह केला होता. बाबासाहेबांचे विचार प्रवर्तक आणि मार्मिक लेखनही आढळते संत वाङ्मयातील नैतिक शिकवणुकीचा भाग सामाजिक सौहार्दाला उपयुक्त आहे असे ते म्हणाले होते. लोकसाहित्य हा सांस्कृतिक अविष्कार आहे असे त्यांचे मत होते त्यामुळेच हे साहित्य जतन केले पाहिजे अशी भूमिका त्यांनी स्वीकारली होती. आधुनिक वाङ्मयात नाटक हा प्रकार त्यांना विशेष आवडला होता. म्हणूनच प्रबोधनकार ठाकरे यांचा खरा ब्राह्मण या नाटकावर त्यांनी समीक्षा लिहून साधक बाधक चर्चाही जनता पाक्षिकांतून केली होती. मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासात वृत्तपत्रीय कर्तुत्वाला महत्त्वाचे स्थान आहे. हे त्यांच्या लेखनातून लक्षात येते १९३७ साली, बाबासाहेबांनी लिहिलेल्या आणि ही "ॲनिहिलेशन ऑफ कास्ट" या ग्रंथाच्या सुरुवातीला सुप्रसिद्ध विचारवंत एच. ड्रयुमांड यांचे एक अवतरण दिले आहे. त्यात ड्रयुमांड म्हणतात की, 'जो माणूस आपल्या सत्सत विवेक बुद्धीचा वापर करणार नाही त्याला हटवादी समजले पाहिजे, जो आपल्या सत्संग विवेक बुद्धीचा वापर करीत नाही त्याला मूर्ख समजले पाहिजे, आणि जो आपल्या सत्संग विवेक बुद्धीचा वापर करण्याचे धैर्य दाखवत नाही त्याला गुलाम म्हटले पाहिजे.' हटवादीपणा व मूर्खता या परिवर्तनवादी संकल्पना आहेत. अर्थातच त्या बदलल्या जाऊ शकतात कळत नकळत त्या नष्टही करता येतात किंवा संपुष्टातही आणता येतात; परंतु अनादी कालापासून आपले अस्तित्व अबाधित ठेवीत आलेल्या गुलामीला संपुष्टात आणणे अथवा नष्ट करणे सोपे नाही. गुलामी ही भारतीयांच्या हाडामासाशी खिळलेली आहे. माणसाच्या सर्वांगी विकासासाठी त्याच्या सत सदसद् विवेकबुद्धीचा




विकास होणे, अत्यंत आवश्यक आहे. सदसद् विवेकबुद्धीचा विकास हा भेदभाव नष्ट करतो, समानतेच्या मार्गाने पुढे नेण्यास मदत करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक अंधारात असलेल्या लोकांना उजेडात आणण्याचे काम केले. शिक्षणाने सक्षम बनले पाहिजे असा आग्रह धरला समान न्याय समभाव यावर भर दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण जीवन हे समाजकल्याणात, समाजाला सक्षम करण्यात घालविले. त्याच्या स्वप्नांला सत्यात परिवर्तित करून टिकवून ठेवणे हे आजच्या पिढीच्या हाती आहे.



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण आणि अपेक्षित वर्तमान

आधुनिक केसरी

**महापुरुष अल्पायुषी असतात. आपल्या शरीरातील रक्ताचा थेंब थेंब आटवून आणि अनमोल जीवनातील क्षणक्षण खर्चून हे महामानव देशाच्या सर्वांगीण उत्थानासाठी आचार-विचारांची सातत्याने पेरणी करून अजरामर होतात. या महान देशभक्तांच्या तेजपुंज माळेतील मुकुटमणी व्यक्तीमत्व म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर! आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा ६६ वा महापरिनिर्वाण दिन! ६ डिसेंबर १९५६ साली संपूर्ण देश शोकसागरात बुडाला! दिन,दलित, शोषित, उपेक्षित वंचितांचा आवाज शांत झाला. उणेपुरे ६२ वर्षे संघर्षमय जीवन जगलेल्या या महामानवाने आज अखेरचा श्वास घेतला!**

अखंड हयात जनसामान्यांच्या उद्धारासाठी आयुष खर्च करणारा महापुरुष आज कायमचा शांत झाला! उपेक्षितांच्या जीवन-जगण्यासाठी आपल्या जीवनाची पर्वा न करता प्रस्थापितांशी लढण्यासाठी तयार असणारा महायोद्धा आज कायमचा स्थिरावला! जात-पात-धर्म-पंथ-लिंग-वंश याचा तसूभरही भेदाभेद न करता इथल्या प्रत्येक लहानसहान घटकाचा विचार करणाऱ्या दिन-दलित-दुबळ्यांच्या आईचे आजमहापरिनिर्वाण झाले! अक्षरशः संपूर्ण देश पोरका झाला! अखंड देश शोकसागरात बुडाला! परंतु 'उपजल्या पिंडा मरण सांगाते' या तुकोक्तीप्रमाणे प्रत्येकाचा इहलोकीचा प्रवास निश्चितपणे थांबणार आहे. या नैसर्गिक न्यायाने बाबासाहेब आपल्याला सोडून गेले, जातांना मात्र अनंत जबाबदाऱ्या आपल्यावर सोपवून गेले. शतकानुशतकांच्या प्रतिक्षेनंतर महापुरुष जन्माला येतात आणि जातांना मात्र विशालकाय पोकळी सोडून जातात. हे लोक कालवश झाल्यानंतरच्या पिढीला अक्षरशः त्यांचे हिमालय कार्य-कर्तृत्व पेलत नाही. त्यांच्या कार्याचा झंजावात एकदमच थांबतो आणि त्या उंचीचा माणूस तिथे कुणीच उभा नसल्यामुळे मागची जनता सैरभैर होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य खऱ्या अर्थाने पुढे नेण्याची जबाबदारी देशातील सर्वच दुरंधरांची होती आणि अजून ती संपलेली नाही. स्वतंत्र भारतातील असे एकही क्षेत्र नव्हते ज्यावर बाबासाहेबांचा प्रभाव नव्हता! बाबासाहेबांनी देशाच्या सर्वच क्षेत्रात मुलभूत क्रांती घडवून आणली. स्वातंत्र्य चळवळीत इंग्रजांना त्यांच्याच भाषेत सवाल करून देश सोडायला भाग पाडले. प्रस्थापितांना विस्तापितांविषयी विचार करायला लावले आणि विस्थापितांना माणूस असल्याची जाण करून दिली. माणसांमधील माणूस जागा करण्याची मूलगामी क्रांती करून बाबासाहेब आधुनिक भारतातील आद्य क्रांतिप्रवण महामानव ठरले. याची नाळ सरळ त्यांचे गुरु संबोधि बुद्ध, क्रांतीबा फुले आणि कबीरांशी जुळते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, बौद्धिक आणि धार्मिक क्षेत्रातील त्यांचे उत्तुंग कार्य त्यांच्या पश्चात तेवढ्याच ताकदीने पुढे चालवणे तत्कालीन सर्वांचीच जबाबदारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात भीष्मकार्य केले. अनेक अशक्यप्राय पदव्या-संशोधनाचे विक्रम केले. मुंबई विद्यापीठ, कोलंबिया विद्यापीठात 'भारतातील जातीः यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास', आणि लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स येथे 'दि प्रॉब्लेम ऑफ द रुपीः इट्स ओरिजिन एंड इट्स सोल्युशन' या क्लिष्ट विषयावर संशोधनाचे कार्य करून जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवला. त्याशिवाय 'पाकिस्तान-भारताची फाळणी', 'शुद्र पूर्वी कोण होते?','गांधी आणि अस्पृशांची मुक्ती', 'स्टेट्स एंड मायनॉरीटीज', 'महाराष्ट्रः एक भाषिक प्रांत', 'रिडल्स इन हिंदूइझम', 'बुद्ध आणि त्याचा धम्म', 'वेटिंग फॉर विजा', 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' इत्यादी संशोधनात्मक महत्वपूर्ण ग्रंथ लिहून समाज-देशाला दिशा दाखविण्याचे, जागृतीचे कार्य केले. यात कळसाचे कार्य म्हणजे २ वर्षे ११ महिने १८ दिवस अहोरात्र जागून जगातील सर्वश्रेष्ठ संविधान भारताला बहाल केले. याशिवाय बाबासाहेबांनी अनेक मोर्चे आणि उठावात लोकांना आपल्या न्याय्य हक्कांसाठी जागृत केले. हजारो किलोमीटर कोणत्याही सुविधेविना प्रवास करून सभा घेतल्या, भाषणे केली. एक रुपयाची अपेक्षा न ठेवता माझा दिन-दलित-उपेक्षित-वंचित-शोषित-पिडीत बहुजन जागला-जगला पाहिजे ही एकच तळमळ हृदयात पेटवून हा वेडा फकीर वणवण



फिरत राहिला, बोलत राहिला, लिहित राहिला. त्यांनी स्वतंत्र पक्ष काढून निवडणुका लढल्या. भारताचे पहिले केंद्रीय कायदामंत्री झाले आणि जेंव्हा पवित्र संसदेतसुद्धा भेद आढळून आला तेंव्हा कायदामंत्रीपदाचा राजीनामा फेकून सरकारच्या बाहेर पडले. त्यांच्या जीवनातील अत्युच्च कार्य कोणते असेल तर ते १४ ऑक्टोबर १९५६ रोजी केलेले धम्मांतर होय! भारताच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धर्म क्रांती होती. धर्मासंबंधी प्रतिज्ञा केल्यापासून जवळपास तीस वर्षे इथल्या व्यवस्था बदलाची वाट पाहिली, मात्र ती बदलायला तयार नव्हती, परिणामी त्यांनी धम्मांतर केले. यानंतरचा प्रवास फार जबाबदारीचा होता. हृदयाची शस्त्रक्रिया झाल्यानंतर जशी काळजी घ्यायची असते तशी धम्मांतरीत समाजाने काळजी घेणे गरजेचे होते. त्यावेळी बाबासाहेब म्हणाले होते, "बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर तुमचीही जबाबदारी मोठी आहे. लोकांमध्ये आदर-सन्मान वाढेल अशीच कृती तुम्ही केली पाहिजे. ...आपण उत्तम रितीने धर्माचे पालन करण्याबाबत विचार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होता कामा नये. यासाठी आपण बौद्ध धम्म तत्वाचे पालन करणे व त्यानुसार आचरण करण्याचा दृढ निश्चय केला पाहिजे." हे फार मोठे पाउल होते, परंतु त्यानंतर दोन महिन्यानंतर बाबासाहेबांचे निर्वाण झाले आणि धम्मांतरित लोक सैरभैर झाले. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर जाऊन अर्धशतकाचा मोठा काळ लोटला आहे. मागील लोकांनी म्हणजे आपण सर्वांनी त्यांचा वसा आणि वारसा जपायला हवा होता. सत्तरीच्या दशकांपर्यंत त्यांचा प्रभाव इथल्या समाजमनावर टिकून होता. शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र काहीकाळ जिवंत होता. इथल्या शिक्षक-तरुण-संशोधकांनी बाबासाहेबांचे अनुयायी होणे गरजेचे होते. त्यांच्या विशाल कार्याचा आदर्श ठेऊन लेखन-संशोधन होणे अपेक्षित होते. दुसरीकडे तमाम राजकारण्यांनी बाबासाहेब आपले आदर्श ठेऊन शेवटच्या माणसाचे उत्थान होण्यासाठी संसदेपासून ग्रामपंचायतपर्यंत कार्य करणे अपेक्षित होते. असे झाले असते तर एवढे घोटाळे, एवढा अपहार झाला नसता. राशन, बीपीएल, निराधार, कर्जमाफीची आवश्यकता पडली नसती. आपोआप आरक्षण संपले असते. रिपब्लिकन पक्ष स्थापन करून प्रस्थापितांना पर्याय देऊन देशातील तमाम वंचित-शोषित जमात राजकीय जमात व्हावी हे त्यांचे स्वप्न होते. त्याशिवाय बाबासाहेबांनी उभारलेली धम्म चळवळ भरकटत गेली. दुर्दैवाने तसे झालेच नाही. एक मात्र छान झाले ते म्हणजे वंचित-उपेक्षित लोकांना धम्मामुळे सन्मानाने-समानतेने जगण्याचे भान आले. याशिवाय पुढच्या पिढीने बाबासाहेब जयंती-पुण्यतिथी-मिरवणूक-निळ्या रंगाचे गडद प्रदर्शन एवढ्यातच सीमित ठेवले. काही राजकारण्यांना बाबासाहेब पेलवले नाही तर काही राजकारण्यांनी फोटोला हार घालून, त्यांना पोस्टरपुरते सोबत ठेवले. बाबासाहेबांच्या अनुयायांनी त्यांच्या राजकीय चळवळीचे पुरते वाटोळे करून टाकले. तमाम विस्तापितांना एकत्र घेऊन प्रस्थापितांना शह देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची चळवळ उभी करून वंचित-उपेक्षित हे राज्यकर्ते झाले पाहिजे हा मूलमंत्र बाजूला ठेवून रिपब्लिकन वैयक्तिक अस्मिता दाखवण्यासाठी पुढे आणला. परिणामी बहुजन समाज बुद्ध धम्म आणि रिपब्लिकन विचारापासून दुरावला. बाबासाहेबांनी बांधलेले सुंदर घरटे उत्तराधिकाऱ्यांनी तोडून-मोडून टाकले. मित्रहो, आज या महामानवाच्यामहापरिनिर्वाण दिनी सर्वांनीच जागे होण्याची वेळ आली असून शिल्लक राहिलेली चळवळ पुनरुज्जीवित करून सर्वार्थाने पुन्हा बाबासाहेबांची मुलभूतक्रांतीची नव्याने मांडणी-बांधणी करणे काळाची गरज आहे, अन्यथा भविष्य खडतर आहे! जय भारत! जय भीम!

# तो अनुभवाच्या शाळेमध्ये शिकला, विद्यापीठ त्याच्या उशा पायथ्या असते

आधुनिक केसरी

**आनंद याचा आहे की महाराष्ट्रातील समाजाला अण्णाभाऊंच्या साहित्याची महती समजू लागली आहे. समाजभान जागं करण्यासाठी का असेना अण्णा भाऊंची पुस्तकं माणसं चाळताहेत. त्यावरती निष्ठेनं साहित्य संमेलन भरवत आहेत. अण्णा भाऊंची प्रतिभा गौरवली जात आहे डी लिट सारखी मानासन्मानाची पदवी अण्णा भाऊंना दिली गेली हा मोठा बहुमान आहे अशा मनुष्याचा ज्याने औपचारिक शिक्षण देणाऱ्या शाळेची दीड दिवसही नीट पायरी चढली नाही. मी मन:पूर्वक एमजीएम चे कुलपती अंकुशराव कदम, राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे साहित्य समेलन औरंगाबादचे प्रा. डॉ. सुधाकर शेंडगे दादा आणि कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य विचार संमेलनाचे संयोजक, निमंत्रक कॉ. गणपत भिसे यांचे जाहीर अभिनंदन करतो आणि आभारही व्यक्त करतो. हे लोक अण्णा भाऊंच्या ' हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे' या विधानाभोवती अधेरेखीत प्रश्नांची सोडवनूक करणाऱ्या प्रतिभेला गौरवीत आहेत.**



## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील

भाग : ५

या दोन आठवडा भरातील काळात या सलग दोन घटना घडल्या अण्णाभाऊंच्या संदर्भानं
एक : अण्णाभाऊंना एम जी एम विद्यापिठाने मरणोत्तर मानद डी लिट पदवी माना सन्मानाने कृतज्ञतापुर्वक प्रदान केली.ही संकल्पना आणि संकल्प माध्यमांपुढं कुलपती डॉ यांनी जाहिर केला.
डी लिट संदर्भातील सामान्य ज्ञान : 'ही कोणती पदवी आहे आणि कोणाला मिळवता येते, कोणाला दिली जाते ?' हा प्रश्न आपल्याला पडणं स्वाभाविक आहे. विद्यापीठ स्तरावर एम. फिल. अर्थात 'मास्टर ऑफ फिलॉसॉफी', पीएच. डी. अर्थात 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' या पदव्या नियमीत शिकून दोन ते पाच वर्षांचा सखोल आभ्यास आणि त्या आभ्यासाची सैधांतिक मांडणी केलेला २०० ते ३०० पानांचा प्रबंध सादर करुन त्याची त्याची अंतर्गत आणि बहिर्गत किमान दोन तज्ञांकडून तपासनी केली जाते आणि त्यांच्या स्विकृती अहवाला नंतर मौखिक परिक्षेला सामोरं जावं लागतं.तीन चार वर्षे तावून सुलाखून निघाल्या नंतर या पदव्या बहाल केल्या जातात.
डी लिट ह्या पदवीचे शिक्षण पीएच.डी. नंतरचे संशोधन कार्य म्हणून घेता येते ज्याचा आवाका पीएच. डी. च्या पुढचा असतो. सलग चार पाच वर्षांचा सखोल संशोधनाचा काळ आणि कांही मुलभूत हाती लागावं आणि समाज विकासाला गती मिळावी या साठी अशा जनहितकारी संशोधन कार्याची ही पदवी असते, ज्याकडं सहसा कुणी फिरकत नाही.फार फार तर एखाद दुसरा पीएच डी धारक पोस्ट पीएच.डी. अर्थात पीएच. डी. नंतरची पीएच. डी. करतात. रीतसर डी.लिट. केल्याचे उदाहरणं मोजकेच निघतील आणि अनेक विद्यापिठांनी या सखोल संशोधनाची सोय नाही.
'मग ही 'मानद डी. लिट.' काय आहे आणि कोणाला दिली जाते ?' हा प्रश्न येतो. साधारणपणे दोन तीन कारणांसाठी मानद डी. लिट. दिली जाते.
१. समाजाचं काम करणारे जबाबदार नागरीक.
२.विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या प्रेरणादायी व्यक्ती.
३.एखाद्या विषयात तज्ञ असणारी किंवा एखाद्या विषयावर यशस्वी रिसर्च करणारी व्यक्ती.
अशी व्यक्ती राजकीय, सामाजिक, आर्थीक, साहित्यिक, विज्ञान, कृषी, शिक्षण क्षेत्रातील असू शकते. जिवंत अथवा मृत असू शकते.अशा व्यक्तीच्या जीवनकार्याचा कृतज्ञता पुर्वक जाहिर सन्मान करण्याच्या हेतूने ही पदवी प्रदान करण्याचा इतिहास आहे.

**एमजीएम ने केला अण्णाभाऊंचा ऐतिहासिक बहुमान आणि अण्णाभाऊ झाले डॉ अण्णाभाऊ साठे :** महात्मा गांधी मिशन अर्थात एम जी एम स्वायत्त विद्यापिठ औरंगाबाद या विद्यापिठाने क्रांतीकारी निर्णय घेऊन आपल्या विद्यापिठाची पहिली मानद मरनोत्तरडी लिट अर्थात डॉक्टर ऑफ लिटरेचर ही पदवी थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांना बहाल केली. विद्यापिठाचा हा सोहळा विद्यापिठाच्या इतिहासात गौरवाने सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच विद्यापिठाच्या 'रुक्मिनी सभागृहात' संपन्नही झाला. हा सन्मान अण्णाभाऊंच्या वतीने त्यांच्या स्नुषा सावित्रीबाई साठे यांनी कृतज्ञतापुर्वक स्विकारला आणि नातू साठे यांनी विद्यापीठ प्रशासनाचे मनःपूर्वक ऋण व्यक्त केले. दि. २८ नोव्हेंबर २०२२ रोजी कुलपती अंकुशराव कदम यांनी हा सन्मान प्रदान करताना अण्णाभाऊंच्या प्रतिभेला केलेले वंदन मोठे मौलिक आहे. ते म्हणाले, "अण्णाभाऊ साठे यांची विपूल साहित्यसंपदा आणि सामाजिक कार्य आमच्यासाठी सदैव आदर्श असून एमजीएम विद्यापिठाची पहिली डी.लिट.पदवी प्रदान करताना आम्हाला अभिमान वाटतो." संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांनी 'अण्णा भाऊंचा महाराष्ट्राकडून हा सन्मान व्हायला उशीर झाल्याची खंतही नांदेड येथे त्यांचा समाजाच्या वतीने आयोजीत केलेल्या सत्काकार प्रसंगी बोलून दाखवली. मोठ्या थामाटात संपन्न झालेला हा सोहळा गावकुसाबाहेरच्या जगाच्या व्यथा वेदनांचा सन्मान होता.हयातभर परीसरातील कनखर माणसांचं जगणं शब्दबद्ध करत राहिलेल्या थोर लेखकाचा हा सन्मान होता.वारणा-कृष्णा खो-यात, सांगली सातारा जिल्ह्यातील मानवतावादी मूल्य जपणा-या तमाम आया-बहिनींचा हा सन्मान आहे. महाराष्ट्र अखंड अभंग रहावा म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभारलेल्या शाहिरी पथकाचा ज्यात शाहिर अण्णा भाऊ साठे, शाहिर अमर शेख, शाहिर गव्हाणकर यांचा सन्मान आहे.डाव्या चळवळींनी आरंभी कामगार आण्णाभाऊंच्या अंगी असलेल्या साहित्यिक क्षमता हेरुन पोवाडे लिहायला प्रेरीत केलं त्या कम्युनिष्ठ चळवळींना सलाम आणि मानवंदना देणारी ही घटना आहे. अण्णाभाऊंनी आयुष्यभर 'पुरुषांचा स्वाभिमान,स्त्रियांचं शील आणि देशाचं स्वातंत्र्य' या त्रिसूत्रीला आपल साहित्य वाहिलं असल्याची नोंद आपल्या संशोधनात प्राचार्य आणि विचारवंत डॉ. माधवराव गादेकर यांनी केलेली आहे.

**अण्णा भाऊंच्या नावे साहित्य संमेलने :** अण्णा भाऊंच्या नावानं प्रागतीक साहित्य संघाचं सलग आकरा वर्षांनी सुरु असलेलं कॉ.पानसरेंनी सुरु केलेलं आणि आकरावं वर्ष गाठलेलं 'कॉ अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन औरंगाबाद' येथे जेष्ठ साहित्यिक सूर्यनारायण रणसुभे सरांच्या अध्यक्षते लोकवर्गनीतुन लोकसहभागासह संपन्न झालं ज्याचे स्वागताध्यक्ष प्रा.डॉ. सुधाकर शेंडगे दादा होते.या संमेलनाचं उद्घाटन उर्दू शायर हसन कमाल यांनी केलं आणि थोर साहित्यिक रावसाहेब कसबे, सकाळचे संपादक उत्तम कांबळे होते.
हयात असतानाच अण्णाभाऊ पहिल्या दलीत साहित्य संमेलन मुंबई इथं संपन्न झालं त्याचे उद्घाटक होते आणि तिथून त्यांनी ' 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे' असं ठनकावून सांगूनधर्म व्यवस्थेला मुळातून हादरा दिला होता.हयातभर अस्पृष्य समाजाचं दुखणं आपल्या साहित्यातून मांडलं. गावकुसाबाहेरचा माणूसही माणूसच आहे आणि गावातल्या माणसांसारखीच त्यालाही तहान-भूक लागते, किंबहुना कडकडून लागते, ज्याची तजवीज व्यवस्थेच्या पातळीवरच असायला हवी, ही भूमीका ठामपणे मांडणारा तळमळीचा, तळागाळाचा मानवतावादी साहित्यिक आहेत अण्णाभाऊ. औरंगाबाद शहरातील चौका चौकातून क्रांतीकारी कवितांचं सामुहीक गायन, वाचन करत मंडळी सभागृहात आली आणि दोन दिवस अण्णाभाऊंच्या साहित्यातून प्रतिबिंबीत झालेल्या मूल्यव्यस्थेवर आणि समकालीन साहित्य आणि समाज अशा विषयांवरती घानापाती चर्चा झाली.या वर्षी हा विचार उत्सव प्रागतीक साहित्य संघाने घडवून आनला ज्याचे संस्थापक वंदनीय माजी कुलगुरु नागनाथ कोतापल्ले सरांचंही हृदयविकाराच्या तिव्र धक्याने निधन झाले.मराठी भाषा आणि साहित्याचा जेष्ठ साहित्यिक ज्याने हयातभर पुरेगामी मानवतावादी मूल्यांनी भरण पोषण केले असा वैचारीक दृष्ट्या उन्नत माथा आपण गमावला.वंदनीय सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. स्व. कॉ. गोविंद पानसरे यांनी हा धरधगता अग्नीकुंड सुरु ठेवला, हीच कृतज्ञता बाळगुन औगाबादच्या साहित्य शाखेनं कॉ अण्णाभाऊंच्या सन्मानार्थ हे आगळं वेगळं संविधान मूल्यांना अधोरेखीत करणारं साहित्य संमेलन दि. ३ आणि ४ डिसेंबर रोजी साजरं करुन इज्जत कमावली आहे.माझ्या अडचनींमुळं मला संमेलनाला जाता आलं नाही.कधी नव्हे तेवढी आज महाराष्ट्राला आज फुले-शाहू-आंबेडकर-अण्णभाऊंच्या विचारधारेची गरज आहे.विवेकाचा विकासाचा आणि विनम्रतेचा विचार शिरोधारी धरुनच आज चालंत रहानं काळीची गरज आहे.या दृष्टीने हे संमेलन अत्यंत महत्वाचं पाऊल आहे.
दुसरं साहित्य संमेलन शेलू जि. परभणी येथे होवू घातलं आहे याच डिसेंबर महिन्यात.सामाजिक चळवळ आणि साहित्याचा आभ्यासू साहित्यिक म्हणून नावलौकिक कमावलेले आभ्यासू साहित्यिक आणि मराठी भाषा आणि साहित्याचे प्रा.डॉ. मारोती कसाब या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असणार आहेत.महोदय हल्ली अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयात मराठीचे प्रोफेसर आहेत हे संमेलन मागील १९ वर्षांनी कॉ. गणपत भिसे आणि त्यांचे कॉम्रेड सहकारी मोठ्या निष्ठेने आणि नियमीत भरवत आलेले आहेत. यासंमेलनाचे उद्घाटक म्हणून ग्रामिण कथाकार व कादंबरीकार आसाराम लोमटे असणार आहेत. कॉ. गणपत भिसे महोदय, क्षमा असावी, या साहित्य संमेलनाला मी वेळ देवू शकलो नाही. आमच्या महाविद्यालयाचं याच महिन्या दोन महिन्यात नॅक कडून मानांकण आणि मूल्यांकण होणं अपेक्षीत आहे. मीच अंतर्गत गुणवत्ता हमी विभागाचा समन्वयक असल्या कारणानं मला वेळ देता येत नाही. महाराष्ट्र पातळीवर 'नाही रे' वर्गाच्या याही कष्टकरी श्रमीक मजुरांच्या प्रश्नांवर लढाऊ संघटन उभं केलेल्या गणपत भिसे महोदयांच्या कष्टाने उभ्या राहिलेल्या साहित्य संमेलनाला माझ्या मनःपुर्वक शुभेच्छा आहेतच.
'फकिरा', 'वारणेचा वाघ','वैजयंता', 'माकडीचा माळ','चित्रा', 'संघर्ष' अशा वाचकांनी जगभर डोक्यावर घेतलेल्या कादंब-या असोत माही तर 'आवडी','सापळा', 'उपकाराची फेड', 'डोळे', 'समशानातील सोनं' सारख्या कथा असोत, अण्णाभाऊ आपल्या समोन नैतिक जीवन ठेवत ठेवतच समाजाच्या सर्वस्तरीय प्रश्न मांडतात. त्यांच्या युक्तीवादाला विज्ञानाचा, विवेकाचा, माणुसकीचा .मौलिक अधार असतो. अण्णाभाऊं सर्व प्रकारच्या शोषणाचा विरोधच करतात आणि प्राकर्षाने अशा माणसांचं शोषण ज्यांच्या हाडा-मांसाचे लचके तोडत गावगुंडांनी दहशत पसरवली आहे परीसरात. अशा जमीनदारी आणि सरंजामशाही अमानुषांनी निष्ठूरपणे तळागाळीतील मजुरांच्या, कामगारांच्या केलेल्या शोषणाला पायबंद घालणा-या कथा, कादंबया, नाटक, वगनाट्य, पोवाडे, छक्कड, प्रवासवर्णन आदी साहित्य अण्णाभाऊंनी लिहिल्या आहेत. वाटेगाव, वाळवा, सांगली आणि एकुनच वारणा आणि कृष्णा नद्यांच्या खो-यातील भूमीहीन कष्टकरी, शेतमजूर आणि त्यांच्यावर होत राहिलेल्या अमानुष अन्याय-अत्याचारांचा समाचार घेणारं अण्णाभाऊंचं वाङमय माणसाच्या भूकेमुळं मांडलेल्या अवहेलनांचा चढता आलेख मांडणारा दस्तैवज आहे. आठराविश्व दारिद्र्याच्या दलदलीत जन्मलेल्या जातीवर आधारीत अन्याय अत्याचारात भरडलेला सगळ्या दास्यत्वाच्या साखळदंडांनी जखडून टाकलेल्या काळात, सगळ्या स्वरुपाच्या यातना भोगून भूख, गरीबी आणि त्या अनुषंगाने आलेली उपेक्षा आणि वंचना, अन्याय-अत्याचाराची सूप्त आवस्थेतील चीड घेऊन वाटेगाव ते मुंबई आणि नंतर मुंबई ते मॉस्को (रशिया) असा अलौकीक जीवन प्रवास करणारा प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणजे अण्णा भाऊ साठे. आनंद याचा आहे की महाराष्ट्रातील समाजाला अण्णाभाऊंच्या साहित्याची महती समजू लागली आहे. समाजभान जागं करण्यासाठी का असेना अण्णा भाऊंची पुस्तकं माणसं चाळताहेत. त्यावरती निष्ठेनं साहित्य संमेलनं भरवत आहेत. अण्णाभाऊंची प्रतिभा गौरवली जात आहे डी लिट सारखी मानासन्मानाची पदवी अण्णाभाऊंना दिली गेली हा मोठा बहुमान आहे अशा मनुष्याचा ज्याने औपचारिक शिक्षण देणा-या शाळेची दिड दिवसही नीट पायरी चढली नाही. मी मनःपुर्वक एमजीएम चे कुलपती अंकुशराव कदम, राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे साहित्य समेलन औरंगाबादचे प्रा. डॉ.सुधाकर शेंडगे दादा आणि कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य विचार संमेलनाचे संयोजक, निमंत्रक कॉ. गणपत भिसे यांचे जाहिर अभिनंदन करतो आणि आभारही व्यक्त करतो.हे लोक अण्णाभाऊंच्या ' हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे' या विधानाभोवती अधेरेखीत प्रश्नांची सोडवनूक करणा-या प्रतिभेला गौरवीत आहेत. अण्णा भाऊ याऔपचारिक शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या परंतू आज औपचारीक शिक्षण व्यवस्थांच्या आभ्यासक्रमांनी समाविष्ठ झालेला थोर साहित्यिक जगभरातील भाषांनी अनुवादीत झाला आहे. आता डी.लिट. पदवीने अण्णा भाऊंची प्रतिभा मराठी वाङमयाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदवावी अशी आहे.
शेवटी एवढंच म्हणेन माझ्या गजलेच्या भाषेत...
तो अनूभवांच्या शाळेमध्ये शिकला,
विद्यापिठ त्याच्या उशा पायथ्या असते.

***(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत.***

# समतादूत बाबासाहेब



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**बाबासाहेब १४ एप्रिल १८९१ या वर्षी दिवशी जन्मास आले. भिमराव रामजी आंबेडकर ते महामानव बाबासाहेब आंबेडकर हा एक अनंताचा खडतर प्रवास आहे. भिमराव रामजी आंबेडकर "उर्फ" महामानव बाबासाहेब आंबेडकर असे म्हणणे कदाचित सर्वसामान्य जनतेसाठी परवलीचे असेल परंतू हा "उर्फ" सकल मानवजातीला एक चिरंतन प्रेरणा देणारा अदभूत प्रवास आहे. सर्वच जन्माला बालक म्हणूनच येतात.**

भिमराव हे बालक मात्र सामान्य म्हणून जन्माला आले तरी या बालकाचे जीवन सकल मानवजातीला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या, स्वातंत्र्याच्या, आत्माभिमानाच्या व आत्मसंमानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणारी एक दैदिप्यमान ज्योत नव्हे तर एक चिरंतन मशाल आहे. आज भिमराव हे केवळ एक नाव नसून ती एक संकल्पना आहे. ते एक महाशक्तीमान बळ आहे.
भिमराव रामजी आंबेडकर ते बाबासाहेब आंबेडकर हा एक वादळी प्रवास आहे. अवसान गळालेल्या पामरांचा श्वास आहे. दीन दलितांना आपल्या आत्मसंम्मानाकडे घेऊन जाणारी एक शिडी आहे. अज्ञानी व आंधळ्या समाजाची काठी आहे.
भारतीय समाज प्राचीन काळापासून मानवजातीला काळिमा फासणाऱ्या जातीभेदाच्या कलंकाने ग्रासलेला होता. साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधनारी ही सुंदर भूमी जातिभेदाच्या नावाखाली आपल्याच पुत्रांचे काही समाज घटकांकडून होणारे शोषण असहायतेने पाहत होती. मानव म्हणून जगण्याचा अधिकार नाकारून पशुवत वागणूक याच भूमीच्या लेकरांना दिली जात होती. जाती भेदाच्या ह्या भिंती अभेद्य वाटाव्यात अशाच होत्या. या भिंतींना जमीनदोस्त करून जातीभेदाच्या साखळदंडात जायबंदी झालेल्या असहाय दलित जनतेला आत्मसंमानाची पहाट नव्हे तर भर दुपार निर्माण करण्याची लिला करणारा एक महामानव म्हणजे बाबासाहेब.
बाबासाहेबांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे वर्षानुवर्षे पददलित व मागास ठेवल्या गेलेल्या व राहिलेल्या समाजासाठी स्वातंत्र्याची व आत्माभिमानाची गुरुकिल्ली असणारा महान ग्रंथच आहे. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा" हा मंत्र बाबासाहेबांनी संपुर्ण मानवजातीला दिला. शिक्षणाची व शिकण्याची तृष्णा जितकी बाबासाहेबांना होती तेवढी कदाचित ना कोणाला त्यांच्या आधी होती ना कधी येणाऱ्या भविष्यात कोणाला असेल. बाबासाहेब हे आपल्या संपुर्ण आयुष्यभर एक विद्यार्थी राहिले. त्यांच्या नावापुढे असलेल्या पदव्या त्याची अमीट साक्ष आहे.
बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली बौद्ध धर्माची निवडही बाबासाहेबांनी खूप विचारांती केली केवळ बौद्ध धर्मच पददलित समाजाच्या पिचलेल्या मानसिकतेचे उत्थान घडवून आणू शकतो हे बाबासाहेबांना ठाऊक होते व त्याचबरोबर आवश्यक असलेली सामाजिक शांतता केवळ बौद्ध धर्मच प्रस्थापित करू शकतो हे सुद्धा बाबासाहेबांना ठाऊक होते. आज भारतीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात दलित समुदायाने ताठ मानेने आपले पाय रोवले आहेत. वर्षानुवर्षे एका ग्लानीत व मरगळीत असलेला समुदाय नव चैतन्याने व आपल्या आत्मसम्मानने यशाची शिखरे पादाक्रांत करत आहे. कधीकाळी समाजाच्या जातीव्यवस्थेच्या उतरंडीत अगदी तळाला स्थान असलेल्या समुदायाचा सदस्य, माननीय के आर नारायणन, भारताच्या राजकीय जीवनाच्या सर्वोच्च स्थानावर विराजमान झाला आहे. मायावतींसारख्या धडाडीच्या महिला मुख्यमंत्री पदी निवडल्या गेल्या होत्या. या व अशा अनेक क्षेत्रात आज दलित समुदायाने आपली छाप सोडली आहे. हे सारे जादू झाल्यागत वाटते, परंतु ही जादू घडविणारा किमयागार म्हणजे महामानव बाबासाहेब होत....!!!
जीवनाच्या सर्वच क्षेत्रात बाबासाहेबांना गती होती मग ते राजकारण असो, समाजकारण असो, विज्ञान असो वा अर्थकारण असो. बाबासाहेबांच्या विचारांची आवश्यकता जितकी शंभर वर्षांपूर्वी होती, तितकीच, किंबहुना त्याहून जास्त आज आहे. आजही या भारतीय समाजातील मरगळ व ग्लानी पूर्णार्थाने दूर झालेली नाही. आजही आपल्याला बाबासाहेबांचे विचार अंगिकरण्याची आवश्यकता आहे. बाबासाहेब एक ध्येयवेडे व्यक्तिमत्व होते.
आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. दुसऱ्या दिवशी ७ डिसेंबर रोजी मुंबईतील चैत्यभूमी येथे त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले.

# तलावात घाण टाकणाऱ्याविरुद्ध कारवाईस सिंचन विभाग उदासीन

## ग्रामस्थ करणार लवकरच जलसमाधी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील बनशेंद्रा गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाणपोही येथील लघु पाझर तलावात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मंगल कार्यलयात उरलेले उष्ट अन्न, पत्रवाळी,प्लास्टिकचे ग्लास, चिरलेले वांगे, फ्लॉवर, भेंडी, मटकी भाजी, शिळा भात व तळलेले पदार्थ पिकअप गाडीने आणून टाकली होती गावकऱ्यांनी पाहिले असता तलावात पाण्यावर तेलाचा तरंग पत्रावळी प्लास्टिक ग्लास यांचा थर आढळून आला होता त्यामुळे गावाकऱ्यात संतापाचे वातावरण पसरले होते कारण गावाला पिण्याचे पाणी पुरवठा करणारी विहिर याच तलावात असून याच तलावाचा काठावर अंगणवाडी व हाकेच्या अंतरावर वस्तीशाळा असून या बालगोपालांनाही याच ठिकाणावरून पिण्यास पाणी उपलब्ध होते त्यामुळे या तेलकट पाण्यातून विषबाधा होऊ नये म्हणुन व काही दुर्घटना घडू नये म्हणुन गावाकऱ्यांनी व ग्रामपंचायतणे लेखी निवेदन एम.आय.अनमाड, कंनिष्ठ सहाय्यक अभियंता सिंचन विभाग,तहसीलदार,पोलीस विभाग यांना दिले होते मात्र  त्यामुळे काही दुर्घटना घडू नये म्हणुन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, गावकरी व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली होती व काही दुर्घटना घडल्यास सर्वस्वी जबाबदारी प्रशांनाची राहील असेही कळविले होते मात्र हा पाझर तलाव ज्यांच्या कार्यक्षेत्रात व अधिकारात येतो तो सिंचन विभाग अजूनही झोपेत असून साधा पंचनामा या विभागाने केला नसून या विभागाचे व्ही. पी.कांबळे (उपविभागीय जलसंधरण अधिकारी, कन्नड)यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कीं आम्ही अजूनही याबाबत वरिष्ठ कार्यलयास अहवाल पाठवला नाही कारण त्या पाझर तलावात मत्स्यबीज सोडणाऱ्या व्यक्तीने ते अन्न टाकलेले असून त्याचा जबाब अद्यापही नोंदलेला नाही त्या व्यक्तीचा जबाब नोंदून अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवणे आहे असे मोघम उत्तर दिले मात्र या उत्तरावर ग्रामस्थ नाराज असून त्या मत्स्यव्यावसायिक व सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यात अर्थपूर्ण व्यवहार झाल्याची चर्चा दबक्या आवाजात चर्चा चालू असल्याचे विश्वसनीय सूत्राकडून माहिती मिळाली आहे.



बनशेंद्रा ग्रामपंचायतणे आमच्या कार्यालयास लेखी निवेदन याबाबतीत दिले असून दोषी असणाऱ्या लोकांवर आम्ही कायदेशीर कारवाई करन्यासाठी वरिष्ठ कार्यालयास तसा प्रस्ताव पाठवणार आहे मात्र ती घाण मत्समारी करणाऱ्या व्यक्तीने टाकल्याचे समजले असून त्या व्यक्तीचा जबाब नोंदवल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाचा निर्णय आल्यावर काय कारवाई करता येईल ते तपासून कारवाई नक्की केली जाईल .
**व्ही . पी .कांबळे ( उपविभागीय जलसंधरण अधिकारी, कन्नड )**

गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाझर तलावात मत्समारी करणाऱ्या व्यक्तीने टाकाऊ अन्न आणून टाकले होते मंगल कार्यलयात उरलेले टाकाऊ अन्न, थर्मोकॉलच्या पत्रवाळ्या,प्लास्टिकचे ग्लास, शिजवलेला खराब झालेला भात, चिरलेल्या व शिजवलेल्या भाज्या पिण्याच्या पाण्यात आणून टाकल्याने पाण्यावर तेलाचा तरंग साचला होता प्लस्टिक ग्लास, पत्रावळी यांचा थर साचल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता मात्र सिंचन विभागाचा भोंगळा कारभार यनिमित्ताने चव्हाट्यावर आला असून अद्यापही साधा पंचनामा नाही कारवाई तर लांबच तर इतर प्रशासन तालुक्याच्या ग्रामपंचायत निवडणुक कार्यक्रमात व्यस्त असल्याने कारवाईस अर्थपूर्ण जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे .




# महापरिनिर्वाणदिनी महामानवाला वह्या-पेनांची अनोखी आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन आदरांजली वाहण्यासाठी येत असताना फुल-हार, मेणबत्ती, अगरबत्ती व इतर नाशवंत वस्तूंना न आणता "एक वही व एक पेन" सोबत आणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखी असे अभिवादन करूया असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाच्या वतीने करण्यात आले होते, त्याच पार्श्वभूमीवर आज महापरिनिर्वाण दिनी हजारो वही पेन संकलित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी धुळे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती पुतळ्याजवळ हजारो अनुयायांनी अभिवादन करण्यासाठी येत असतात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या आव्हानानंतर अनेक अनुयायांनी या ठिकाणी  हजारो वही, पेन व शालेय वस्तू या ठिकाणी देऊन या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाची शिकवण दिल्याप्रमाणे वही पेन जर त्यांच्या चरणी वाहिली तर हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आजारांसाठी ठरेल असे आवाहन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी फुलहार ऐवजी वही पेनांची आदरांजली हे वही पेनची चळवळ झालेले अभियान मागील तीन वर्षापासून धुळे शहरात चालवले जात असून, या ठिकाणी जमा झालेल्या वही, पेन सर्वच समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शाळेत जाऊन वाटप करण्यात येते जेणेकरून त्यांच्या शिक्षणाला हातभार लागेल या उद्देशानेच हे अभियान राबविले जात आहे. या अनोख्या अश्या उपक्रमाला उस्फुर्त असा प्रतिसाद मिळाला या कार्यक्रमाची दखल धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश रेड्डी, नगरसेवक नागसेन बोरसे, नाना भाऊ साळवे, रणजीत राजे भोसले, किरण जोंधळे, धीरज पाटील, शशिकांत वाघ, नागसेन बागुल, एस.यु. तायडे, नगरसेविका वंदना भामरे यांनी दखल घेतली व त्यांनी देखील आपल्या वतीने वही पेन या ठिकाणी दिले.  यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष विशाल पगारे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष किरण ईशी, उत्तर महाराष्ट्र संघटक हेमंत पवार उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष लखन साळवे जिल्हा उपाध्यक्ष भैय्या खरात शहराध्यक्ष नागेंद्र मोरे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष सुगत मोरे अल्पसंख्यांक आघाडी जिल्हाध्यक्ष मज्जित मदारी, रोहित म्हसदे, राहुल पवार, सचिन खरात, अजय पगारे, दादा पगारे, सुनी पगारे, वृंदावन पवार, मनोज नेरकर, पंकज गायेकावड, यश म्हासदे, ईश्वर घोरपडे, मयूर बेडसे, दीपक जाधव, बंटी पगारे आदी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवशक्ती-लहुशक्तीच्या माध्यमातून मुख्यमंत्री मातंग समाजाला न्याय देणार

## सत्तार यांच्या उपस्थितीत शिष्टमंडळाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवशक्ती-लहुशक्ती या आघाडीला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांची शिवसेना प्रणित आघाडी बनवून मातंग समाजाला सर्वांगीण न्याय देतील असे प्रतिपादन आज ता.03 रोजी राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी शिष्टमंडळाला दिले. शहरातील शासकीय विश्रामगृहात झालेल्या मातंग समाजाच्या बैठकीत ते बोलत होते. मातंग समाज हा प्रामाणिक समाज असून सदैव हिंदुत्वाच्या विचारसरणीतुन कायमच एकनिष्ठपणे शिवसेनेसोबत राहिलेला आहे मात्र सामाजिक न्यायापासून अजूनही वंचित राहिलेला आहे. परंतु आता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे समाजाप्रती सकारात्मक असून ते शिवशक्ती-लहुशक्ती च्या माध्यमांतून समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर हात घालून त्यांना सर्वांगीण आणि सामाजिक न्याय देतील आणि समाजाने सुद्धा ज्या-ज्या गोष्टी अपेक्षित आहे त्या आमच्या लक्षात आणून द्याव्यात अशीही अपेक्षा त्यांनी यांवेळी व्यक्त केली. शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊंच्या पुतळ्याजवळ असलेल्या नेहरु बाल उद्यान येथे समाजासाठी भव्य-दिव्य सभागृह येत्या शंभर दिवसांचे आत बांधण्याचा प्रयत्न करु त्याचबरोबर सिल्लोड शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात त्यांचा पूर्णाकृती पुतळा व भवन येथे लहुजी साळवे यांच्या स्मारकाचे काम देखील तात्काळ करु असाही शब्द त्यांनी यांवेळी शिष्टमंडळाला दिला.

याप्रसंगी शिवशक्ती-लहुशक्ती या संकल्पनेचे प्रणेते गौतम वैराळे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजू आहिरे, मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, जिल्हा सचिव अशोक शिरसाठ, ज्येष्ठ नेते अशोक कांबळे, साहेबराव दणके, किशोर तुपे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, ऍड कुंडलिक घाटे, देविदास कसबे, अशोक नाडे, ऍड राहुल आव्हाड, जि.प.सदस्य बाळासाहेब शिरसाठ, बाळासाहेब पवार, राजेंद्र खरात, समाधान लोखंडे, अंबादास पवार, राहुल अंभोरे, संजय कांबळे, मचिंद्र बैलम, नागेंद्र वाघमारे, अरविंद पाखरे, विजय आहिरे, ज्ञानेश्वर निळाळजे, भरत मानकर, सुरेश चंदनशिव, रविंद्र गायकवाड, डॉ.डॉन अंबिलढगे, प्रकाश पडवळ, पांडुरंग गायकवाड, नामदेव शरणागत, रविंद्र खरात, आनंद वाघमारे, दत्ता बारवकर, भगवान उकंडे, भुपेंद्र अंभोरे, शारदा निर्मळ, स्वाती जोगदंडे, दिपमाला निकम आदींसहित राज्यांतील विविध जिल्ह्यांतून आलेल्या समाजबांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार संदीप मानकर यांनी मानले.



# आर्य चाणक्यमध्ये १४०५ विद्यार्थ्यांनी केले भगवद्गीतेचे पठण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था , अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्रा. विद्यामंदिर पैठण येथे गीता जयंती निमित्ताने गीतेच्या १२व्या, १५ व्या अध्यायाचे पठण १४०५ विद्यार्थ्यांनी सामूहिक रितीने केले .

भारतीय संस्कृती व हिंदू धर्मात सर्वश्रेष्ठ असलेल्या श्रीभगवद्गीता आहे.तेव्हा गीता जयंती निमित्ताने आर्य चाणक्य प्रा . विद्यामंदिर,पैठण च्या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विद्यासभा अध्यक्ष, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई डॉ. जयंत जोशी, प्रमुख मार्गदर्शक पैठण संतपीठचे प्रपाठक डॉ. प्रा. राधाकृष्णआकोलकर, प्रमुख अतिथी शिवाजी मारवाडी, स्था. व्य. समिती कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, मनोज शुक्ल, डॉ. राम लोंढे, अँड संदीप जाधव, शशिकांत घेर, नानक वेदी, दादा बारे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीभगवद्गीता ग्रंथ, भारतमाता, भगवान श्रीकृष्ण, योगी अरविंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थी शालेय गणवेशात व  अतिशय शिस्तीत बसून गीतेच्या १२ व्या व १५ या अध्यायांच पठण करण्यात आले.अतिशय भावस्पर्शी अनुभव याप्रसंगी उपस्थितींनी अनुभवला. कार्यक्रमाची भूमिका कार्यक्रमाचे अध्यक्ष जयंत जोशी यांनी  मांडली .डॉ. जोशी  बोलताना " भगवद्गीतेतून आपण जीवन जगण्याची कला शिकली पाहिजे विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भगवद्गीतेला राष्ट्रीय ग्रंथ म्हणून घोषित केल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. राधाकृष्ण आकोलकर यांनी मार्गदर्शन करताना बोलले की"जाती, धर्मा पलीकडे जाऊन गीता तत्वज्ञान आहे. आपण कसे आहोत? कोणत्या वर्णाचे जातीचे, धर्माचे, रंगरूपाचे आहोत हे श्रेष्ठ नव्हे तर कर्म श्रेष्ठ महत्त्वाचे आहे हे भगवद्गीता सांगते. या शुभप्रसंगी संचालक रेणूकादास गर्गे, रविंद्र साळजोशी, डॉ. जालिंदर येवले,अनिल कावसानकर, प्रकाश पानगे,नरेश मानधणे,भागिनाथ चव्हाण, श्रीपाद पवार आदी मान्यवर उपस्थित होते.  मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या  उत्तम नियोजनाने व मार्गदर्शनात सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना गिरवलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी केले.



# जनहित याचिकांच्या कार्यवाहीचे थेट प्रक्षेपण व रेकार्डिंगसाठी याचिका

## याचिकेवर उच्च न्यायालय व सरकारला उत्तर देण्याचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मुंबई उच्च न्यायालय व त्यांच्या खंडपीठांमध्ये 'संवैधानिकदृष्ट्या महत्त्वाच्या व समाजातील मोठ्या समूहावर प्रभाव टाकणाऱ्या जनहित याचिकांच्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण (लाइव्ह स्ट्रीमिंग) व ऑडियो- व्हिडिओ रेकार्डिंग करावे यासह इतर मागण्यांसाठी जालना येथील पीपल्स राइट्स व्हिजिलन्स ऑर्गनायझेशन व संभाजी ब्रिगेड, जालना यांनी जनहित याचिका क्रमांक /89/2021 मध्ये दाखल केलेल्या दिवाणी अर्जावर 2 डिसेंबर 2022 रोजी न्यायमूर्ती विभा कंकनवाडी व न्यायमूर्ती अभय एस. वाघवासे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

या प्रकरणी मुख्य प्रतिवादी असलेल्या मुंबई उच्च न्यायालयाने व अन्य प्रतिवादींनी दि. 2 जानेवारी 2023 पर्यंत शपथपत्रावर आपले म्हणणे मांडावे व त्याची प्रत याचिकाकर्ता यांना द्यावी. तसेच प्रतिवादी यांनी जून महिन्यात जनहित याचिकेतील इतर मागण्यांबाबत शपथपत्रावर उत्तर दाखल करण्याच्या न्यायालयीन आदेशाचे पालन करावे व ते उत्तरही यासोबतच दाखल करावे असे निर्देश खंडपीठाने दिले आहेत.

पीपल्स राइट्स व्हिजिलन्स ऑर्गनायझेशन, जालना या संस्थेचे महासचिव राकेश ओमप्रकाश अग्रवाल यांनी सिव्हिल अर्जात म्हटले आहे की, जनतेवर किंवा मोठ्या लोकसंख्येवर परिणाम करणाऱ्या याचिकांच्या न्यायालयीन कार्यवाहीचे लाइव्ह स्ट्रीमिंग व ऑडिओ-व्हिडिओ रेकार्डिंग देशातील इतर उच्च न्यायालयांमध्ये सध्या होत आहे. ते महाराष्ट्रातही सुरू करण्याचे आदेश द्यावे. भारतीय संविधान व निष्पक्ष न्यायाच्या उन्नतीसाठी हे आवश्यक आहे. जनहित याचिका क्रमांक 89 /2021 मध्ये अशा आहेत प्रमुख मागण्या...

**1. मध्यमवर्गियांना परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा:** महाराष्ट्रातील मध्यमवर्गियांना परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा म्हणून 'मध्यम आयवर्गीय विधी साहाय्य योजना' लागू करावी. अशी योजना सध्या सर्वोच्च न्यायालय व इतर राज्यांमधील हायकोर्टांमध्ये लागू आहे. मग ती महाराष्ट्रातही का असू नये? या योजनेला भारतीय संविधान 1950चे कलम 39 अ आणि विधिसेवा



प्राधिकरण कायदा 1987च्या कलम 29 व 29 अ यांचा आधार आहे.

**2. राजभाषा मराठीस न्यायालयात योग्य वागणूक मिळावी:**
महाराष्ट्राची राजभाषा मराठीत केलेली याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारावी. तसेच आर्थिक किंवा अन्य असमर्थतेमुळे वकील न लावू शकणारा याचिकाकर्ता स्वतः पार्टी इन परसन (PARTY IN PERSON) यांनी महाराष्ट्राची राजभाषा मराठीत केलेली याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारावी आणि त्यांना समान वागणूक मिळावी किंवा पार्टी इन परसन याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीसाठी वेगळी व्यवस्था किंवा त्याबाबत उपयुक्त नियम बनवण्याचे आदेश देण्यात यावे. भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार व महाराष्ट्र राज्यातील उच्च न्यायालयांनी बनवलेल्या नियमांना अनुसरूनच ही मागणी केलेली आहे.

**3. 'पार्टी इन पर्सन'ला सुलभ प्रवेश मिळावा:**
राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या (पार्टी इन पर्सन) उच्च न्यायालयात प्रवेशावर नियंत्रण आणि अडथळे निर्माण करणारी व न्याय मिळवण्यापासून सर्वसामान्य नागरिकांना (पार्टी इन पर्सन) वंचित करणाऱ्या अधिसूचना क्रमांक P.1602/2015 आणि G/AMEND/654/2015, DATED 09.09.2015 या रद्द करण्यात याव्यात. आणि प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास (पार्टी इन पर्सन) महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयात सुलभ प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी आदेश देण्यात यावे.

**4. रिट (WRIT) जारी करण्याचे अधिकार जिल्हास्तरावर द्यावेत:**
राज्यातल्या प्रत्येक नागरिकाची 'न्यायापर्यंत सुगम पोहोच' (EASY ACCESS TO JUSTICE), 'उच्च न्यायालयात वाढत्या प्रलंबित याचिकांचा लवकर निपटारा व्हावा' यासह 'नागरिकांना जलद आणि परवडणाऱ्या दरात न्याय मिळावा म्हणून रिट (WRIT) जारी करण्याचे अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयापुरते मर्यादित न ठेवता भारतीय संविधानाचे कलम 32 (3) मधील तरतुदीनुसार राज्यातील जिल्हा न्यायालयांनाही मर्यादित क्षेत्रापुरते मर्यादित रिट जारी करण्याचे अधिकार द्यावेत किंवा राज्यात जिल्हास्तरावर काही रिट न्यायालयांची स्थापना करावी.

असे केल्यास जिल्हा प्रशासकीय अधिकारी (आयएएस किंवा आयपीएस) यांच्या विरुद्धच्या लहान-सहान किरकोळ न्यायिक किंवा प्रशासनिक तक्रारींचे निवारण जिल्हा न्यायिक अधिकारीच (PDJ) करू शकतील. त्यामुळे राज्यातला 'एक सर्वसामान्य नागरिक' त्याच्याच जिल्ह्यात न्याय मागण्यास सक्षम होईल. परिणामी प्रत्येक नागरिकास न्याय व त्याच्या मूलभूत हक्कांचे निश्चितपणे संरक्षण हे उद्देश काही अंशी पूर्ण होतील. या प्रमुख चार मागण्या उपरोक्त जनहित याचिकेत करण्यात आल्या आहेत.



# कुलपती डॉ. अंकुशराव कदम यांचा मातंग एकता आंदोलनाच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वास्तववादी साहित्यक्षेत्रातील कोहिनुर हिरा म्हणून ओळखले जाणारे साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे यांना संभाजीनगर (औरंगाबाद) शहरातील व शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत नावाजलेल्या महात्मा गांधी मिशन (MGM) या विद्यापीठाने मरणोत्तर डी.लिट पदवी देऊन सन्मानित केले. खऱ्या अर्थाने हा ऐतिहासिक निर्णय घेऊन त्यांनी फक्त नावाला मोठमोठे परंतु शिक्षणाचे बाजारीकरण करणाऱ्या विद्यापीठांना एक प्रकारची चपराकच दिली... म्हणून त्यांची कृतज्ञता व्यक्त करणे हे समाजाचे परम कर्तव्य आहे या उदात्त हेतूने "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी सामाजिक संघटनेच्या वतीने एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांचा डॉ.अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा विद्यापीठाला भेट देऊन सत्कार करण्यांत आला. याप्रसंगी प्रोफेसर व संगीत विभागप्रमुख डॉ.संजय मोहड, सरस्वती भुवन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.संजय गायकवाड यांचेसमवेत मातंग एकता आंदोलनाचे राज्य, जिल्हा, तालुका व विभाग स्तरांवरील संभाजीनगर शहर व ग्रामीण भागातील राज्यसर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# राज्यपालांना निलंबित करा अन्यथा बसपा तीव्र आंदोलन करणार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** छत्रपती शिवाजी महाराज आमची अस्मिता असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरल्यामुळे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगत कोशारी यांची रवानगी तात्काळ दिल्लीला करा अन्यथा ठिय्या आंदोलन करणार असल्याचे औरंगाबाद बसापा चे जिल्हा प्रभारी बाबासाहेब पगारे यांनी मुख्यमंत्र्यांना एका निवेदनातून केली आहे. यात केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल ऐकरी शब्द वापरल्यामुळे तसेच आमदार प्रसाद लाड यांचे राजीनामे घेऊन यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी बसपा तर्फे करण्यात आली आहे अन्यथा येणाऱ्या 14 डिसेम्बरं ला वैजापूर चे आमदार रमेश बोरनारे यांच्या कार्यलय समोर ठिय्या आंदोलन करण्याचा ईशारा ही मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.

याप्रसंगी बसपाचे पंडित दादा बोर्डे, सचिन बनसोडे, समाधान जाधव, शंकर चोथे, आयुब पटेल, काशिनाथ बागुल, वाल्मिक वाघ, बाळू शिनगारे, बाबासाहेब साळवे, नितीन निकम, ऋषिकेश त्रिभुवन, एस. पठारे,गणेश त्रिभुवन, अमोल त्रिभुवन, सतीश आव्हाड, बाळासाहेब पवार व किरण वाघ आदी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



# डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिम्मित आज वैजापूर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशी,मा. आमदार भाऊसाहेब तात्या चिगटगावकर, उपनगराध्यक्ष साबेरभाई, डी वाय एस पी मेहक स्वामी , पी.आय.सम्राटसिंह राजपुत, शिवसेना तालुकप्रमुख राजेंद्र साळुंके, शहरप्रमुख पारस घाटे,न.प गटनेते दशरथ बनकर, प्रकाश चव्हाण,उल्हास ठोंबरे, भाजपा शहराध्यक्ष दिनेश राजपूत, राजेश गायकवाड, प्रशांत सदाफळ, नगरसेवक शैलेश चव्हाण, मनिष गणविर,आबा जेजूरकर, वाल्मिक इंगळे, सूचित कांबळे, अमोल बोरनारे, श्रीकांत साळुंखे, राजविर त्रिभुवन, ताराचंद त्रिभुवन, सुनील पवार, नगरसेविका संगीता राजेश गायकवाड, के. आर. पडवळ, बाळासाहेब शिंदे, साहेबराव पडवळ, कमलेश आंबेकर, बबन त्रिभुवन, ज्ञानेश्वर आदमाने, विलास म्हस्के, सिद्धार्थ भुईगळ, बाळासाहेब शिंदे, समता सैनिक दलचे विकास गायकवाड, महिला मंडळ सर्व स्तरातील मान्यवर आदिसंह सर्व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे शिवाजी विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव बोधिसत्व ज्ञानाचा अथांग महासागर आदरणीय भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज जय कालिंका देवी शिक्षण संस्था संच सावळदबारा येथे संस्थेचे अध्यक्ष श्री भावराव कोलते व सचिव श्रीमती रत्नाबाई कोलते व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री कोलते एन आर व प्रा प्रा थोटे वाय वाय व शेळके पीवी यांच्या हस्ते व मेणबत्ती लावून महामानवाला अभिवादन करण्यात आले यावेळेस प्राचार्य कोलते सर यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून कशाप्रकारे शिक्षणाशिवाय कोणाची प्रगती नाही त्यासाठी शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देऊन मनपूर्वक अभ्यास केला पाहिजे व व जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे त्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडू शकते व माणसाचा कुटुंबाचा



समाजाचा व साहजिकच देशाचा विकास हा यामुळे भारतीय राज्यघटना निर्माण करून जगामध्ये एक वेगळा आदर्श बाबासाहेबांनी निर्माण करून दिला त्यामुळे आजही सुवर्ण अक्षरांमध्ये त्यांचे नाव लिहिले तरी कमीच आहे. अशा या महामानवाला अभिवादन करण्यात आले विद्यार्थ्यांनी महामानवाला अभिवादन म्हणून आज शाळेच्या प्रांगणात राज्यघटनेचे वाचन करून व पुस्तकांचे वाचन करून खऱ्या अर्थाने महामानवाला अभिवादन केकेले याप्रसंगी प्रत्येक विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी प्रार्थना केली की आयुष्यात कोणत्याही प्रकारचे व्यसन करणार नाही माझ्यामुळे कोणाला त्रास होईल असे वागणार नाही व प्रज्ञा शील करुणा हे तत्व जीवनात अंगीकृत करून शिका व संघटित व्हा अशा गगनभेदी घोषणा दिल्या व महामानवाला अभिवादन करण्यात आले व अभिवादन केले करण्यात आली संस्थेतील सर्व प्राध्यापक मोहने सर गावंडे सर चोपडे सर शिसोदे सर चव्हाण सर राठोड सर पडवळ सर शिक्षक विकास पाटील विजयसिंह राजपूत भास्कर ससाने विनोद जाधव संजय जोशी श्रीकृष्ण सोनवणे सुदाम राठोड मुकुंदा व्यवहारे भास्कर खमाठ पोपटराव सोनवणे ज्ञानेश्वर राठोड अजबराव चव्हाण श्याम जाधव व शिक्षकेतर बाबासाहेब कोलते राहुल बडक, संदीप कोलते गजानन चव्हाण विनोंद चव्हाण बंधू व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती जीवन कोलते यांनी दिली.



# रक्तदान करून महामानवास अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सकाळी डॉ.शरद भामरे यांनी करूना सोशल ब्लड ग्रूपतर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. त्यावेळी धुळे जिल्ह्यातील अनेक भिमसैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा जवळ रक्तदान करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यावेळी रक्तदानासाठी अनेक तरूण मुले मुली यांची रांग लागली होती. या कार्यक्रमाला शिवसेनेचे डॉ. सुशिल महाजन, अतुल सोनवणे, किरण जोंधळे, भरत मोरे, प्रविण साळवे आदींसह असंख्य शिवसैनिकांसह राष्ट्रवादीचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष रणजीतराजे निखील देवरे, महेंद्र शिरसाठ, जितेंद्र पाटील आदी उपस्थित होते. तसेच काँग्रेसचे युवराजआबा करनकाळ , किरण नगराळे, विमलताई बेडसे, बानूताई शिरसाठ, राजेंद्र खैरनार, आयुब खाटीक, भिवसन अहिरे, हरिभाऊ चौधरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी किरण नगराळे यांनी स्वतः रक्तदान केले . तसेच धुळे शहराचे आमदार फारूक शहा यांचे सचिव सिद्धार्थ जगदेव यांच्यासह एमआयएमच्या अनेक पदाधिकाऱ्यांची देखील उपस्थिती होती . यावेळी दलित समाजाचे प्रभाकर जाधव, शशिकांत वाघ, काशिनाथ ढोढरे, शंकरअण्णा खरात, बापू बागूल आदिंसह असंख्य नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# तलाठी संघाच्या जिल्हा अध्यक्षपदी सतीश भदाने

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी सतीश भदाने यांची औरंगाबाद जिल्हा तलाठी संघाच्या अध्यक्षपदी एक मताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल तालुक्यातील तलाठी संघटनेकडून सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल प्रभारी तहसीलदार मोनाली सोनावणे, नायब तहसीलदार शेख हारुण, दिनेश राजपूत, मंडळ अधिकारी आबा पाटील, तलाठी बाळू घटे, रमेश चव्हाण, दीपक एरांडे, आशिष सुरपम, रंजना कल्याणकर, कल्पना डिघोळे आदींनी अभिनंदन केले..

# बिडकिन येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकिन येथील तथागत नगर मधील बुद्धविहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.मानवंदना व प्रार्थना हि घेण्यात आली.यावेळी सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने, पोलिस उपनिरीक्षक महेश घुगे, शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे, माजी सरपंच अशोक धर्मे, ओमप्रकाश जैस्वाल, रिपाइं नेते अमोल नरवडे, माजी ग्रामपंचायत सदस्य उत्तम धर्मे, अमोल वंजारे,सागर फरताळे, चंद्रकांत चाबुकस्वार,अजय भीवसने,जीवन नरवडे, संदिप गायकवाड, अंकुश धर्मे, प्रविण चव्हाण,आदींची उपस्थिती होती.



तसेच ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे व रुग्ण कल्याण समिती सदस्य अमोल नरवडे व वैद्यकीय अधिकारी डॉ संजय गोरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथील वैद्यकीय कर्मचारी व सर्व स्टाफ यांची उपस्थिती होती.
यावेळी दोन्ही ही ठिकाणी बिडकिन व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेच्या मुलांना दिले जातेय आत्मसंरक्षणात्मक धडे



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सध्याच्या स्पर्धेच्या युगात अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्राकडे विद्यार्थी शिक्षक पालक यांचा कल दिसून येत असतो यातच वैजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत चक्क मुलांना आत्मसंरक्षणात्मक धडे देण्यासाठी कराटे प्रशिक्षण देण्यात येत आहे. सविस्तर वृत्त असे कि वैजापूर तालुक्यातील बोरसर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शिक्षण व खेळ या सोबतच आत्मसंरक्षण हेतूने पहिले ते चौथी च्या मुलांना कराट्याच प्रशिक्षण दर शनिवारी दिल्या जात असून शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दत्तात्रय गायकवाड हे मुलांना कराट्याच प्रशिक्षण देत आहेत त्यामुळे सर्वच स्तरातून त्यांच्या कौतुक होत आहे.

# कुत्र्याला दगड मारल्याच्या वादातून कुऱ्हाडीने वार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पाळीव कुत्र्याला दगड मारल्याने झालेल्या वादातून एकावर कुऱ्हाडीने वार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यातील बाणेर परिसरात ही घटना घडली आहे. पुण्यातील बाणेर परिसरात ही घटना घडली आहे. या प्रकरणी श्वानाच्या मालकास चतुःश्रृंगी पोलिसांनी अटक केली. अयूब बाशा शेख असं 36 वर्षीय असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

# मातोश्री लीलाताई महिला सहकारी पतसंस्थेचे दानवे यांच्या हस्ते उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात मातोश्री लीलाताई महिला सहकारी पतसंस्थाचे उदघाटन महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते करण्यात आले गांधी-भवन कन्नड येथे कार्यक्रमातदानवे म्हणाले की महिलास्वतंत्र बँक असल्याने नियमित हप्ते भरून लोन घेऊन आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात यामुळे महिला सक्षमीकरणात बळकटी मिळेल या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे उदयसिंह राजपूत, उद्योजक मनोज पवार, माजी उपनगराध्यक्ष जावेद शेख, शिवसेना तालुकाप्रमुख संजय मोटे, वाल्मिक लोखंडे, शिवसेना शहराध्यक्ष सुनील पवार अध्यक्ष सोनाली पवार,उपाध्यक्ष उर्मिला पवार, पवन ठाकूर, संदेश पवार,सिध्दार्थ निकाळजे यांची प्रमुख उपस्थिती होती. मातोश्री लीलाताई महिला पतसंस्था सामान्य कर्जदार छोटे छोटे उद्योग यांना कमी दराने कर्जपुरवठा करण्यात येईल असे अध्यक्ष सोनाली पवार व उपाध्यक्ष उर्मिलाताई पवार यांचा उद्देश असल्याचे शिवसेना शहर प्रमुख सुनील पवार यांनी प्रास्ताविक मध्ये सांगीतले तसेच उद्योजक मनोज पवार यांनी महिला बँकेच्या पुढील वाटचालीत मी खंबीरपणे उभा आहे असे सांगुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी संतोष पवार, योगेश त्रिभवन,सतीश खिल्लारे, सोमनाथ दाभाडे, दर्शन देशमुख, प्रवीण घाटगे, महेश सोनवणे, अक्षय केवट, आदित्य शिंदे,याकूब शेख.श्रीमती अर्चना वाडेकर तसेच
बँकेच्या महिला संचालक, तरुण, युवक, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

